
ख्रिस्तायन
ई-अंक
ख्रिसमस २५ डिसेंबर २०१३
संपादक: ख्रिस्तोफर रिबेलो
Designed by OneVasai
ख्रिसमस सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शूभेच्छा

# ख्रिस्तायन

## नाताळ ई-अंक वर्ष तिसरे

## २५ डिसेंबर २०१३

**संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो**

**संपादन साहाय्य**

स्वप्निल रिबेलो

स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

स्नेहल सॅम्युएल आल्मेडा मॅक्लीना रिबेलो

अंक सजावट

**राजन जेरोम डिमेलो**

अंक मांडणी व तांत्रिक सहकार्य

**वनवसई टिम**

**संपर्क / अभिप्राय**

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा

ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com (9819436078)

१वसई :- admin@onevasai.com

**आभार**

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे “ ख्रिस्तायन” तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

## अंतरंग

संपादकाच्या लेखणीतून...

**कथा / ललित लेख :-**

जोसेफ तुस्कानो - एक अफलातून व्यक्तिमत्व – ख्रिस्तोफर रिबेलो

समंजस मुलगा - बेर्नादेत रुमाव

“ती” – सायमन रॉड्रिग्ज

तो परतलाच नाही – अमर म्हात्रे

आठवण - सचिन मेंडिस

संस्कृती-रक्षक – फेलिक्स डिसोजा

पाप की पुण्य – केविन आल्मेडा

स्वप्नाळू – डॅनियल मस्करणीस

संवाद – एमेल आल्मेडा

एक घास – एडवर्ड डिसोजा

कवी आणि कविता – इग्नेशियस डायस

नमस्कार ख्रिस्ता – सुनिल डिमेलो

अंतरीची हाक - ख्रिस्तोफर रिबेलो

**कविता / चारोळ्या :-**

सबिना फोस

एडवर्ड डिसोजा

सचिन मेंडिस

एमेल आल्मेडा

जॉन्सन लोपीस

सुनिल सोकाळकर

**कलाकुसर :-**

पॉल डिमेलो रॉबर्ट परेरा स्टिवन आल्मेडा

# संपादकाच्या लेखणीतून...

वाचक मित्र-मैत्रिणींनो, सर्वप्रथम नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा. पुन्हा एकदा आम्ही साहित्यिक मेजवानी घेऊन आपल्यापाशी आलेलो आहोत.

आम्हा ख्रिस्ती धर्मीयांमध्ये आनंदाचं उधाण घेवून येणारा हा सण. डिसेंबर महिन्याची सुरुवात झाली की एका बाजूने गुलाबी थंडी हळूहळू वातावरणात आपले जाळे विणत जाते आणि दुसरीकडे आगमनकाळाच्या सुरुवातीने आम्हा ख्रिस्ती लोकांची लगबग सुरू होते. वर्षभराच्या दगदग आणि कंटाळवाण्या रुटीन जीवनाला थोडा वेळ दूर सारून गुलाबी थंडीच्या गारव्यात आनंदाची रजई ओढण्याचे हे दिवस असतात. दुख, कष्ट, रोजची कामानिमित्त आणि संसाराचा गाडा हाकताना होणारी ससेहोलपट विसरून क्षितिजापल्याड लुकलुकणाऱ्या तेजस्वी ताऱ्याचे अवलोकन करत जो तो बाळ येशूच्या स्वागतासाठी तयारीला लागतो.

नाताळ सणाच्या आदल्या दिवशी "क्रिब" तयार करून, गच्चीवर तारा उभारून सणाच्या दिवसाची तयारी सुरू होते. गोडधोड पदार्थांची रेलचेल घराघरात होत असते. आम्हीही त्यात सामील झालो आहोत आणि आपणासाठी हा नाताळ अंक रूपी फराळ घेऊन आलो आहोत.

हा अंक हा प्रामुख्याने वसईतील नव कवि-लेखकांच्या साहित्यकृतींनी तसेच प्रतिभावंत चित्रकारांच्या चित्रांनी सजलेला आहे, त्याचबरोबर मराठी साहित्याच्या प्रांगणात आपल्या साहित्यकृतीने एक वेगळा ठसा उमटवणाऱ्या थोर विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो यांच्याही सहभागाने नटलेला आहे. आपणाला जरूर हा अंक  आवडेल अशी आशा आहे.

आतापर्यंत आपल्या परिसरात प्रसिद्ध होत असलेल्या मासिक-पाक्षिक यांचे नाताळ सणानिमित्ताने फक्त विशेषांक प्रकाशित होत असतात परंतु पुर्णपणे नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा "ख्रिस्तायन" हा पहिला प्रिंट व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे.

यापुढेही प्रत्येक नाताळ सणावेळी असाच साहित्यिक फराळ आपणासाठी पेश करायला आम्हाला आवडेलआपल्या सहकार्याची आणि प्रतिक्रियांची आम्हा . ला अपेक्षा आहेत.

नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!

Merry Christmas & Happy New Year.

# जोसेफ तुस्कानो - एक अफलातून व्यक्तिमत्व –

## ख्रिस्तोफर रिबेलो

**नांव :** जोसेफ तुस्कानो

**जन्मतारीख :** १४ नोव्हेंबर १९५३

**पत्ता :** ए-१४०२, क्लबलाईफ, आहुजा टॉवर्स, एक्सर रोड (मराठा बॅन्केच्या मागे), बोरिवली (प.), मुंबई - ४०० ०९१,

दूरध्वनी : २८९५७५५५ (घर) २४१७६३८३ (कार्यालय) ९८२००७७८३६ (भ्रमणध्वनी)

ई-मेल :toscanoj@bharatpetroleum.in

**शिक्षण :** एम. एस्सी. (मुंबई विश्वविद्यालय) : १९७९

डिप्लोमा - इन-पेट्रोलियम टेक्नॉलॉजी (ब्रिटीश इंन्स्टिटयुट, मुंबई) : १९८३

**व्यवसाय :** मुंबईतल्या दोन वस्त्रोद्योग संशोधन संस्थात ६ वर्षे संशोधन (१९७८ ते १९८३)

त्यानंतर 'भारत पेट्रोलियम' या तेल कंपनीत संशोधन; सध्या तिथे देशाच्या पश्चिम विभागाचे गुणवत्ता - आश्वासन प्रबंधक.

**छंद :** विज्ञान, पर्यावरण तसेच ललित विषयावर इंग्रजी – मराठीतून मुक्त लिखाण (प्रौढांसाठी ४२ तर मुलांसाठी १९ पुस्तके; एकूण ६१ पुस्तके प्रकाशित; त्यात ४ इंग्रजी पुस्तके आहेत. शिवाय, ५ इंग्रजी संपादीत पुस्तकात सहभाग)

: तरूणांना नि विद्यार्थ्यांना शरीर शिक्षणाविषयी मार्गदर्शन. विवाहितांना 'निरामय कामजीवन' याविषयी व्याख्याने. पालकांना ताणतणावाविषयी प्रबोधन.

: 'युवदर्शन', 'सुवार्ता', 'सा. डायलॉग' या नियतकालिकांच्या संपादनात सहभाग व विज्ञान विषयक मजकूरांचे संपादन.

'सुवार्ता' च्या पर्यावरण पुरवणीसाठी विजय तेंडूलकर, ज्युलियस रिबेरो, तिनईकर, डेरेल डि'मोंटी या मान्यवरांच्या मुलाखती .

: १९८० पासून वसईच्या पर्यावरण चळवळीत कार्यरत राहून वसई, मुंबई व कोकणातील सामाजिक संस्था, शाळा - कॉलेजेस्, वाचनालये, आर्थिक संस्थात १०० हून अधिक विज्ञान व पर्यावरण विषयक जागृती करणारी व्याख्याने.

: सध्या उच्च माध्यमिक शालेय तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी Science : Fun and Philosophy, तसेच प्रौढांसाठी, 'अरे संसार! संसार!!'' या विषयावर व्याख्याने.

: 'सकाळ' वृत्तपत्रात मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने 'विज्ञान' स्तंभात स्फूटलेखन (२००७) सद्या 'प्रहार' या वर्तमानपत्रातील साप्ताहिक विज्ञान तंत्रज्ञान पुरवणीत 'सायन्स टूडे' हा स्तंभ

(२००९ पासून) आणि सांगलीच्या सा. कृष्णकाठ मध्ये 'विज्ञान नवलाई' हे सदर (२००९ ते २०११).

तसेच मराठी विज्ञान परिषदेच्या 'पत्रिके'त 'परिचित-अपरिचित' या सदरातून स्फूट-लेखन. (२०१० -११)

**अन्य प्रकाशित सदरे / स्तंभ :**

- महाराष्ट्र टाईम्स ''दिनांतरे'' (ऑगस्ट २०१० ते जानेवारी २०११)
- नवशक्ति ''परिसर'' (सोम. ते शनि. सप्टे. २०१० ते जुलै २०१२)
- दिव्यमराठी ''विज्ञानसंदेश'' (दर बुधवारी, जुलै २०११ ते २०१२)
- लोकसत्ता ''कुतूहल'' (२०१२)
- मुंबई सकाळ ''टेक ऑफ'' (२०११)

: १९८० पासून महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ति, सकाळ, पुढारी, केसरी, लोकमत या दैनिकांतून सातत्याने विज्ञान विषयक पाचशेहून अधिक लेख.

: The Financial Express, Sci-Tech Entrepreneurship, Science Today, The Examiner यासारख्या इंग्रजी नियतकालिकातून विज्ञान विषयक लेख प्रसिध्द.

: ‘आकाशवाणी’ वरून पर्यावरण व पेट्रोलियम याविषयावर भाषणे तसेच काव्यवाचन.

: विविध दिवाळी अंकातून लिखाण

# प्रकाशित साहित्य

**विज्ञान साहित्य** :

**विज्ञानकथासंग्रह** : १. शास्त्रज्ञ (१९९२)

२. मॅगीचा दोनदा जन्म (१९९९)

३. रंग रक्ताचा (२००८)

४. वेधक विज्ञानकथा (संपादित - २००९)

५. अनभिज्ञ (२०१२)

**ग्रंथ :** १. वस्त्रायन (१९८४)/ दुसरी आवृत्ती (२०१०)

२. पेट्रोलियम इंधने आणि वंगणे. (१९९३)

३. गुणवत्ता आणि निसर्गमैत्री (१९९६)

४. तारूण्याच्या तीरावर (१९९३)/
दुसरी आवृत्ती (२०१०/ सावध ऐका,
पुढल्या हाका)

५. काळे सोने (२००४) / दुसरी आवृत्ती (२०१२)

६. कामजीवनातले सौदर्य (२००७) / दुसरी
आवृत्ती (२०१०)

७. बदलते वातावरण, बदलती इंधने (२०१०) /
दुसरी आवृत्ती (२०१३)

**अनुवादीत कादंबरी :** १. पुत्र चेटकिणीचा (२०१२)

**विज्ञाननिबंध :** १. विज्ञान झेप (१९९५)

२. कुटुंब नियोजनाची नवी नैसर्गिक पध्दत (१९९३)/
आठवी आवृत्ती (२०१०)

३. घरोघरी विज्ञान (२००२) / दुसरी आवृत्ती २०१३

४. वामनाचे पाचवे पाऊल (२००७)

५. विज्ञान वेध (२०१०)

६. श्रध्दा आणि विज्ञान (२०११)

७. विज्ञान वाटा (२०११)

८. शोधपर्व : २००९ - १० (२०१२)

९. शोधपर्व : २०१० - ११ (२०१२)

१०. निसर्गातून स्वास्थ्याकडे (२०१२)

**चरित्र :** किमयागार स्टीव जॉब्स् (२०१२) /
दुसरी आवृत्ती (२०१३)

**बालसाहित्य :** १. शास्त्रज्ञबाबांची सुटका (१९९४)
२. काळ्या सोन्याची गोष्ट (१९९६) /
दुसरी आवृत्ती २०१३
३. निसर्गमित्रांच्या गोष्टी (१९९९)
४. जगातली आश्चर्ये (२००३)
५. संशोधक सहस्त्रकाचा (२००५)
६. गोष्टी विज्ञानाच्या, मनोरंजनाच्या (२००६)
७. चित्रविचित्र दुनिया (१९९८)
८. कुतुहलातून विज्ञान (२००८)
९. आठवणी संशोधकाच्या (२०१०)
१०. 'ज्वालामुखी', 'वनस्पती', 'हवामान आणि
वातावरण' ही Discovery Channel Series
ची 'पॉप्युलर प्रकाशन' ची अनुवादीत
पुस्तके (२००५)
११. ओळख पर्यावरणाची (२०१०)
१२. नन्हे वैज्ञानिक (हिंदी बालकथाएँ) (२०११)

**संपादित :** मराठी विज्ञान परिषद आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तयार केलेल्या
'विज्ञान आणि तंत्रज्ञान कोशा' चा एक शिलेदार
(२००९)

: 'विज्ञानभारती' तर्फे प्रकाशित 'शिल्पकार चरीत्र
कोशा'त सहभाग (२०१०)

**ललित साहित्य :**

**कथासंग्रह :** १. बंध रेशमाचे (२०००)
२. कृष्णविवर (२००८)

**काव्य :** १. चुकून सुचलेल्या कविता (२०१२)

**ललित :** १. लोकल प्रवास (२०००)
२. भेट (२००८)
३. अंतर्नाद (२०११)

**संकिर्ण :** १. परमाचार्य पोप (२०००) / दुसरी आवृत्ती (२०१३)
२. झुकती दुनिया (विनोद : २००३)
३. लुर्डस मार्ग व्हॅटिकन (तीर्थयात्रा; खाजगी
वितरण : २००५)
४. तुरीनचे अद्‌भूत प्रेतवस्त्र (२००६)
५. फेनफुले (२००६)
६. मैत्र - बन (२००७)
७. चांदण मूठ (२०१०)
८. आभाळमाया (२०१०)
९. समाजमन (स्तंभलेखन : २०१२)

**बालसाहित्य :** १. छोट्या गोष्टी, मोठ्या गोष्टी (१९९६)/ दुसरी आवृत्ती (२०१२)

२. हरवलेला भाऊ (१९९४)

३. करामती बाहुला (बालकादंबरी : १९९९) चौथी आवृत्ती २०१३)

४. हुतात्मा (बालकादंबरी : १९९९)

५. नाताळच्या गोष्टी (१९९९)

# इंग्रजी साहित्य:

**ग्रंथ :** 1) Environmental Protection through Quality Upgradation (2004)
2) Fuels and Environment (2009)

**निबंध :** 1) Natural family Planning (2010)

**बालवाङ्मय :** 1) The Little Scientist (2009)

**अन्य लिखाण :** 1) Current Environmental Issue : Environmental Protection Activities in Petroleum Industry (2003).
2) Air, Water and Soil Pollution (2007): a) Bio degradable lubricants.
b) Bio diesel - Fuel for future.
3) Environmental Degradation & Protection (2007) : Depletion of Natural Resources.
4) Have contributed more than 100 English articles to various newspapers and scientific periodicals on subjects of Environmental, Quality, Conservation, Safety and Science awareness.

**आगामी : -** दिनांतरे (दिनविशेष संग्रह) : डिंपल, मुंबई

- आपले शास्त्रज्ञ : नवचैतन्य, मुंबई
- विज्ञानातले प्रयोग : मॅजेस्टिक, मुंबई
- अद्भूत दुनिया : मॅजेस्टिक, मुंबई

# वाङ्मयीन पारितोषिक

१९८४ : म. रा. सा. सं. मंडळाचे ‘वस्त्रायन’ पुस्तकासाठी अनुदान.

१९९४ : म. खि. सा. परिषदेचा ‘शास्त्रज्ञ’ पुस्तकास उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार.

१९९४ : बालकुमार सा. संमेलनाचा ‘छोटा शास्त्रज्ञ’ पुस्तकास पुरस्कार.

१९९५ : म. सा. प. चा ‘शास्त्रज्ञबाबाची सुटका’ या पुस्तकास पुरस्कार.

१९९७ : को. म. सा. प. चा ‘विज्ञान झेप’ पुस्तकास उत्कृष्ठ साहित्यकृतीचा पुरस्कार.

१९९८ : ‘गुणवत्ता आणि निसर्ग मैत्री’ पुस्तकास महानुभव ग्रंथोत्तेजक पुरस्कार.

१९९८ : बालकुमार साहित्य संमेलनाचा ‘छोट्या गोष्टी, मोठ्या गोष्टी’ पुस्तकास पारितोषिक.

१९९९ : ‘चित्रविचित्र दुनिया’ पुस्तकास आशीर्वाद पुरस्कार.

१९९९ : को. म. सा. प. चा ‘विनूच्या वैज्ञानिक करामती’ पुस्तकास पुरस्कार.

२००१ : सांस्कृतिक व शैक्षणिक मंडळ, अकोला यांच्याद्वारे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय प्रकाशित साहित्यस्पर्धेत उत्कृष्ठ लेखन सादर केल्याबद्दल गौरवपत्र.

२००२ : डॉ. रत्नाप्पा कुंभार वाचनालय लातूर तर्फे ‘बंध रेशमाचे’ या पुस्तकाला संत गोरा कुंभार हा राज्यस्तरीय पुरस्कार.

२००२ : ‘सुवार्ता’ मासिकातर्फे फा. स्टीफन वाड्‌मय पुरस्कार.
२००३ : ‘राष्ट्रीय कलागुण गौरव प्रतिष्ठान’, पुणे तर्फे ‘साहित्य भूषण’ पुरस्कार.
२००३ : ‘साहित्य कलायात्री प्रकाशन’ पुणे तर्फे काव्ययात्री पुरस्कार.
२००३ : को. म. सा. प. चा ‘छोटा शास्त्रज्ञ’ या पुस्तकास पुरस्कार.
२००४ : सांस्कृतिक व शैक्षणिक विकास मंडळातर्फे आयोजित साहित्य स्पर्धेत उत्कृष्ठ लेखन सादर केल्याबद्दल प्रशस्तीप्रत्र.
२००४ : बालकुमार साहित्य प्रतिष्ठान, लातूर तर्फे ‘करामती बाहुला’ या बालकादंबरीला पुरस्कार.
२००४ : इंडियन फिजिक्स असोसिएशनच्या पुणे चाप्टर तर्फे विज्ञान प्रसाराबद्दल प्रा. मो. वा. चिपळुणकर स्मृती पुरस्कार.
२००५ : दिल्ली येथील ‘नॅशनल एज्युकेशन ॲन्ड ह्युमन रिसर्च डेव्हलपमेंट ऑरगनायझेशन’ या संस्थेतर्फे २००६ चा ‘‘राष्ट्रीय निर्माण रतन पुरस्कार’’.
२००६ : मुंबईच्या ‘वंदना प्रकाशना’ तर्फे आाशीर्वाद जीवन गौरव पुरस्कार.
२००७ : मुक्ताई फाउंडेशन, बारामती या संस्थेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ‘आई’ या विषयावरील कविता स्पर्धेत ‘ओले डोळे’ कवितेची दर्जेदार कविता म्हणून निवड.
२००८ : भारत पेट्रोलियम कंपनी तर्फे ‘जनस्फूर्ति पुरस्कार’
२००८ : भुसावळ येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातर्फे ‘कृष्णविवर’ कथासंग्रहाला स्व. बाबासाहेब नारखेडे पुरस्कार.
२००९ : साहित्य दरवळ मंच, मुंबई, यांच्यातर्फे ‘कृष्णविवर’ कथा संग्रहाला पुरस्कार.
२०१० : महाराष्ट्र मुक्त पत्रकार संघटनेतर्फे स्तंभलेखनाबद्दल ‘महाराष्ट्र - दीप’ पुरस्कार.
२०१० : भारत पेट्रोलियम कंपनीतर्फे ‘जनस्फूर्ति पुरस्कार’.
२०११ : प्रकाश - किरण प्रतिष्ठान, अहमदनगरतर्फे ‘कुतहूलातून विज्ञान’ पुस्तकास पुरस्कार.
साहित्य दरवळ मंचतर्फे आयोजित काव्य स्पर्धेत पुरस्कार.
: अल्फा - ओमेगा, मिनिस्ट्री, बीड तर्फे राज्यस्तरीय ‘साहित्य - रत्न’ पुरस्कार.
: साहित्य दरवळ मंच, मुंबई तर्फे ‘विज्ञान वेध’ पुस्तकास पुरस्कार
२०१२ : स्व. कवी निरंजन उजगरे जीवन गौरव पुरस्कार.
म. ख्रि. सा. प.चे ख्रिस्ती साहित्य भूषण पुरस्कार.
२०१२ : महाराष्ट्र संपादक परिषदेत पत्रकार गौरव.
२०१३ : साहित्य आणि संस्कृती मंडळाचा उत्कृष्ठ वाङ्मय निर्मितीचा राज्यपुरस्कार

## ठळक मानसन्मान

१. छोटा शास्त्रज्ञ’ पुस्तकाला तीन पुरस्कार (१९९४, २००३ आणि २००४)
२. वसई विकासिनी कला संस्थतर्फे (१९९५, २०००, २००२ आणि २००६) चार वेळा ‘गुणीजन’ म्हणून सत्कार.
३. वसईच्या ‘साहित्य जल्लोष’ च्या विविध कार्यक्रमात सतत चौदा वर्षे सहभाग (१९९६ ते २०१०)
४. नालासोपारा येथील आदर्श एज्युकेशन सोसायटीतर्फे भरविलेल्या Vasai Taluka Science Exhibition (नोव्हे. २७, १९९३) मध्ये Guest of Honour.
५. Thomas Baptista Jr. College, Papady (Vasai) च्या वार्षिक संमेलनात (ऑक्टो. २, १९९३) Chief Guest.
६. वसईच्या जी. जे. वर्तक शाळेतील Science for All प्रकल्पाच्या कार्यक्रमात (५ ऑक्टो. १९९३) प्रमुख पाहुणे.
७. होली क्रॉस हायस्कुल, निर्मळ येथे भरलेल्या वसई तालुका विज्ञान प्रदर्शनात (२ डिसेंबर १९९७) प्रमुख अतिथी.
८. निर्मळ, वसई येथे भरलेल्या कोकण विभाग ग्रंथालय संघाच्या अधिवेशनात (३१ जाने. १९९९) प्रमुख वक्ता.
९. वसईच्या निर्मला माता हायस्कुल मधील ‘पर्यावरण’ विषयावरील कार्यक्रमात (३ डिसें. २००२) प्रमुख पाहुणे.
१०. चिपळूण येथील बालकुमार साहित्य संमेलनात (२० फेब्रु. २००२) कथाकथन.
११. मुंबई विद्यापिठ आणि संत गोन्सालो कॉलेज, वसई यांच्या संयुक्त विद्यमाने (२१ फेब्रुवारी २००४) ‘मराठी खिस्ती साहित्याचे योगदान’ आयोजित चर्चासत्रात सहभागासाठी आमंत्रित.
१२. संत गोन्सालो गार्सिया विद्यालय, गास (वसई) येथील विज्ञान प्रदर्शनात (२१ डिसेंबर २००५) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती.
१३. विसाव्या राज्यस्तरीय मराठी खिस्त संमेलनात (२८ मे २००५) कथाकथन.

१४. Progressive Education Society च्या शाळेतील Science Day Celebration साठी (फेब्रुवारी २८, २००५) प्रमुख पाहुणे.

१५. वसईच्या संत अलोसियस गर्ल्स हायस्कुलच्या गोल्डन ज्युबिली कार्यक्रमात (फेब्रु. २००५) प्रमुख अतिथी.

१६. माणिकपूर (वसई) येथील सेंट झेवियर हायस्कुलच्या विज्ञान दिन महोत्सवी (२८ फेब्रुवारी २००६) प्रमुख अतिथी.

१७. रामचंद्र वासुदेव नेरकर वसई या माध्यमिक शाळेच्या वार्षिक सोहळ्यात प्रमुख पाहुणे (१२ ऑगस्ट २००६)

१८. 'सुवार्ता', वार्षिक मेळाव्यात (ऑक्टो. २००७) व्याख्यान.

१९. साधना सहकारी पतपेढी, सांडोर, वसईच्या कौतुक सोहळ्यात प्रमुख पाहुणे (२१ ऑक्टोबर, २००६)

२०. वसई कॅथलिक समाज, मुंबईच्या वार्षिक सोहळ्यात प्रमुख पाहुणे (८ ऑक्टो. २००७)

२१. ऑक्टो. २, २००७ रोजी 'सुवार्ता' मासिकाच्या वार्षिक मेळाव्यात 'माझे लिखाण कशासाठी?' या विषयावर व्याख्यान.

२२. सेंट गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई येथील विद्यार्थ्यांना Global warming : its causes and consequences या विषयावर व्याख्यान (२७ नोव्हें. २००७)

२३. नंदाखाल, विरार येथील सेंट जोसेफ हायस्कुल व ज्युनि. कॉलेजच्या वार्षिक संमेलनात व Our Environment या प्रदर्शनात प्रमुख पाहुणे (३ सप्टें. २००७)

२४. वसई जेष्ठ नागरिक संघटना, रमेदी या संघटनेच्या वार्षिक मेळाव्यात 'विज्ञान व धर्म' या विषयावर, २२ डिसे. २००७ रोजी व्याख्यान.

२५. Father Stephen Academy, Girij, Vasai येथील २२ डिसें. २००७ च्या वार्षिक कार्यक्रमात प्रमुख पाहुणे.

२६. फेब्रु. १६, २००८ रोजी Sardar Vallabhabhai Patel Polytechnic, Mumbai च्या विद्यार्थ्यांना Automobiles and Fules या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी Expert Lecturer म्हणून आमंत्रण.

२७. सिंधुदुर्ग जिल्हा ख्रिश्चन विकास मंडळाच्या वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्यात अध्यक्ष पद (३० मार्च २००८).

२८. सेंट थॉमस चर्च, सांडोर, वसई येथे ऑगस्ट २००८ मध्ये आयोजित 'सुखी वैवाहिक जीवनासाठी' मेळाव्यात 'लैंगिकतेचे अध्यात्म' या विषयावर व्याख्यान आणि डॉ. विठ्ठल प्रभू यांची मुलाखत.

२९. सुखसंपत्ती संवर्धक सहकारी सोसायटी मर्सेस वसईच्या २७ एप्रिल २००८ रोजीच्या वार्षिक मेळाव्यात प्रमुख पाहुणे.

३०. आशादीप संघ, गास, वसई या विधवा बायांच्या संघटनेचा, १५ सप्टें. २००८ रोजी आयोजित वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमास प्रमुख पाहुणे.

३१. नोव्हे. २१, २००८ रोजी विरारच्या 'नॅशनल इंग्लिश हायस्कुलच्या' Man on Wheels या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन व अभिभाषण. तद्नंतर २१ डिसें. २००८ रोजी या शाळांतील माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी Science : Fun and Philosophy या विषयावर व्याख्यान.

३२. डिसें. २, २००८ रोजी दयामाता चर्च, मर्सिस, वसई येथे 'निरामय कामजीवन' या विषयावर विवाहितांसाठी व्याख्यान.

३३. आदिवासी जीवन विकास केंद्रातर्फे आयोजित डहाणू तलासरीतील कॉलेज विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (७ नोव्हें. २००८)

३४. जाने. १५, २००९ रोजी लोकमान्य सेवा संघ, पार्ले या संस्थेतर्फे 'दफन की दहन?' या परिसंवादात सहभाग.

३५. ग्रामीण शिक्षण संस्था, सफाळे, येथील शाळेच्या वर्धापनादिनी प्रमुख पाहुणे (१६ फेब्रु. २००९)

३६. मुंबई म्युनिसिपल निवृत्त कर्मचाऱ्यांच्या ३८ व्या वर्धापनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे (११ फेब्रु. २००९) आणि 'उतरत्या वयातले स्वास्थ' या विषयावर व्याख्यान.

३७. सांस्कृतिक उन्मेष, वसई तर्फे आयोजित पहिल्या कुमार साहित्य संमेलनात विज्ञान कथाकथन (२५ फेब्रु. २००९)

३८. २७ मार्च २००९ रोजी 'जेष्ठ नागरिक संघटना', उमराळे, वसई या संस्थेतर्फे आयोजित 'अरे संसार! संसार!!' या विषयावर व्याख्यान.

३९. रामकृष्ण हायस्कुल, बोरिवलीच्या विद्यार्थ्यांसाठी १ मार्च २००९ रोजी Science : Fun and Philosophy या विषयावर व्याख्यान.

४०. महाराष्ट्र सरकारसाठी मराठी विज्ञान परिषदेतर्फे मराठीत तयार केलेल्या 'विज्ञान आणि तंत्रज्ञान कोशा' चा एक शिलेदार म्हणून २६ एप्रिल २००९ च्या प्रकाशन सोहळ्यात डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते सत्कार.

४१. वसईतल्या निर्मळ येथील 'जीवन विकास मंडळ' या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात ३ मे २००९ रोजी सामाजिक योगदानाबद्दल सन्मानपत्र.

४२. बाविसाव्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनात वसई येथे 'ख्रिस्ती धर्म आणि विज्ञान:सुसंगती की विसंगती' या विषयावर शोध निबंध वाचन (८ मे २००९)

४३. संत गोन्सालो गार्सिया, गास हायस्कूल मधील १० वी चे विद्यार्थी व पालक यांच्यासाठी व्याख्याने (२१ जून २००९)
४४. निर्मळ येथिल होली क्रॉस हायस्कूल मधील विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिर (३ ऑगस्ट २००९)
४५. आगाशी च्या जनसेवा मंडळाच्या वार्षिक स्नेह मेळाव्यात प्रमुख पाहुणे (२५ ऑक्टो. २००९)
४६. नालासोपारा येथिल आदर्श एज्युकेशन हायस्कूल समूहातर्फे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रमुख वक्ते. (२५ नोव्हे. २००९)
४७. बोरीवली येथिल सेंट फ्रान्सिस डी' असिसी हायस्कूल व ज्युनियर कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी Stress Management या विषयावर व्याख्याने (फेब्रू. २०१०)
४८. नंदाखाल येथिल कार्मेल कॉन्वेंट हायस्कूलच्या दहावीच्या प्रथम बॅचच्या निरोप सभारंभात प्रमुख पाहुणे (फेब्रु. २०१०)
४९. वसई विकासिनी कॉलेजच्या स्वातंत्र्यदिन सभारंभात प्रमुख पाहुणे. सोमवंशी क्षेत्रीय समाज, वसई, वर्धापनदिन सोहळ्यात प्रमुख वक्ता. (ऑगस्ट १७, २०१०)
५०. मुंबईच्या Peoples Art Centre तर्फे विज्ञान क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'वसई -विरार गौरव पुरस्कार. (ऑगस्ट २२, २०१०)
५१. नानभाट येथिल जनहित सोसायटीच्या वार्षिक सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे. (सप्टेबर २०, २०१०)
५२. चुळणे येथिल 'यंग मेन्स असोशियन'च्या वार्षिक सत्कार सोहळ्यात प्रमुख अतिथी. (ऑक्टो. ३, २०१०)
५३. मुंबईतील 'साहित्य दरवळ मंच' तर्फे, आयोजित काव्य स्पर्धेत 'बदलते संस्कार' या कवितेला उत्तेजनार्थ पारितोषिक. (ऑक्टो. ९, २०१०)
५४. Talk on "Stress Management & Sex Education" to S.S.C. students of Pope John 23rd High School Agashi. (नोव्हे. २, २०१०)
५५. Chief guest at Holy Cross High School, Nanbhat, for Man Made Disaster exhibition. (डिसें. ४, २०१०)
५६. Chief guest at the annual function of Seth Vidyamandir English Highschool & Jr. College, Vasai (E.) (जाने. १४, २०११)
५७. साहित्यिक बाळ राणे यांच्या दादर येथिल सत्कार सभारंभात प्रमुख पाहुणे. (फेब्रू. १८, २०११)
५८. मुंबईतील SNDT विद्यापिठातर्फे आयोजित मराठी विज्ञान साहित्य संमेलनात 'मराठी कवितेतील विज्ञानस्थळे' हा शोधनिबंध सादर. (मार्च ७/८, २०११)
५९. वसई शहर काँग्रेस कमिटी तर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा व विशेष कार्यप्राविण्यांच्या गुणगौरव सभारंभात अध्यक्ष. जुलै १०, २०११)
६०. सेंट जोसेफ कॉलेज ऑफ ऑर्टस् ॲन्ड कॉमर्स तर्फे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात प्रमुख वक्ते. (ऑगस्ट ८, २०११)
६१. समाज उन्नती मंडळ, सोपारा तर्फे आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे. (ऑगस्ट १५, २०११)
६२. Chief guest at 13th Annual Sports meet of Sardar Vallabhbhai Patel Polytechnic, Borivali (W.) (डिसे.१६, २०११)
६३. Chief guest at Vasai taluka level science exhibition held on Rajiv Gandhi Vidhyalay, Nallasopara (W.) (डिसे. २९, २०११)
६४. 'पवित्र भूमी' पुस्तक प्रकाशन सभारंभ, सेंट फ्रान्सिस मॅनेजमेंट कॉलेज, बोरीवली (प.) येथील कार्यक्रमात अध्यक्ष. (जाने. २२, २०१२)
६५. Guest of Honour at Holy Cross Highschool (English Medium), Nirmal's Annual Parents' Day. (फेब्रू. १२, २०१२)
६६. डहाणू आदिवासी विभागातील लोयोलो माध्यमिक आश्रमशाळेच्या S.S.C. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान. (१० डिसे. २०११)
६७. चौथ्या अखिल भारतीय अंध - अपंग साहित्य संमेलनात 'अपंगाच्या आत्मकथनाद्वारे जनजागृती' या परिसंवादात प्रमुख वक्ता. स्थळ वसई. (५ मे २०१२)
६८. नालासोपारा (प.) येथिल निवृत्त शिक्षक श्री. लुईस रॉड्रीग्ज यांच्या ''कृतार्थ मी'' कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे (२ एप्रिल २०११)

६९. बोरीवली (प.) येथिल समाजसेवक श्री. मोझेस डिसोजा यांच्या ''पवित्र भूमी'' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात अध्यक्ष. (२२ जाने. २०१२)
७०. होली क्रॉस हायस्कूल, निर्मळ, येथिल पालकदिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे. (१२ फेब्रू. २०१२)
७१. वसई शहर कॉंग्रेस कमिटीने आयोजित केलेल्या विद्यार्थी व गुणी जनांच्या सत्कार सोहळ्यात अध्यक्ष. (जुलै २०११)
७२. माणिकपूर एज्युकेशन वेल्फेअर फंडाच्या वार्षिक बक्षिस संभारभात अध्यक्ष. (४ नोव्हें. २०१२)
७३. मुंबईतील कवी श्री. रमेश सावंत यांच्या 'गहिवर' काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात विशेष अतिथी. (१० नोव्हे. २०१२)
७४. Inter disciplinary national seminar of Indian Science Literature या श्री. शिव-शाहू महाविद्यालयात (सरूड, कोल्हापूर) आयोजित केलेल्या आंतरविद्याशास्त्रीय व आंतरभाषीय राष्ट्रीय चर्चासत्रात 'मराठीतील विज्ञानसाहित्य' या विषयावर शोध - निबंध सादर.
(डिसें. २१ - २२, २०१२)

# समंजस मुलगा

मुलाला मोकळीक देणे म्हणजे काय ?

मुलांतील अभिव्यक्तीचा आदर करणे. अभिरुची वाढविण्यास साहाय्य करणे. त्यांच्यातील नैसर्गिक उर्मींना न दाबता उमलू देणे, बहरू देणे.

एकदा मी बोरीवली-विरार ट्रेनने प्रवास करीत होते. गाडी बऱ्यापैकी रिकामी होती. समोरच्या खिडकीजवळ एक पाच-साडेपाच वर्षाचा सावळा, कपाळावर गंध ओढलेला. नीटनेटका, तरतरीत मुलगा भेळ खात बसला होता. भेळेतील एकही दाणा न सांडता लवंडता त्याचं मजेत भेळ खाण चाललं होते. बाकाच्या दुसऱ्या टोकाला एक बारीक चणीची धुवट, स्वच्छ साडी परिधान केलेली निष्कांचन स्त्री बसली होती. पलीकडे बसलेल्या दोघी-तिघीच्या गप्पात ती अधूनमधून सहभागी होत होती. स्वच्छ पण भडक कपडयातील त्या सर्व आंध्रभगिनीसोबत त्यांची सोनेरी पट्टयाची जांभळी - पिवळी परकर पोलकं घातलेली मुल-मुलीही होती. त्यात ही बाई तिच्या आणि तिच्या मुलाच्या कपडयाच्या

फिकट रंगसंगतीमुळे जरा वेगळी भासत होती. तिचं बोलणंदेखील जेवढयास तेवढं, सौम्य व खालच्या पट्टीतील होतं. बाई जेमतेम दुसरी तिसरी शिकलेली वाटत होती. सगळ्या पाथरवट स्त्रीया !

मला नालासोपाऱ्याला उतरायचे होते आणि त्याला जवळपास अर्धा तास तरी लागणार होता. निरिक्षणा- शिवाय हातात करण्यासारखे काही नव्हते. गाडीत चढल्यापासून त्या चुणचुणीत मुलाने माझं लक्ष वेधले होते. त्याची भेळ खाऊन होताच, तो हळूच अम्माकडे सरकला, "अम्माsss इल्ला(संपलं)". गप्पा थांबवित तिने एकवार आपल्या मुलाकडे पाहिले. हळूच हसली. मान हलवली व पुन्हा आपल्या मैत्रिणीच्या दिशेने वळली. मुलगा पुन्हा खिडकीकडे सरकला.

'आता हातातील कागदाचा बोळा तो खिडकीबाहेर फेकणार किंवा सीटखाली टाकणार' या माझ्या तर्कावर पाणी फिरवीत त्या मुलाने ते कागद हळूच उलघडले. त्यात उरलेले दोन कुरमुरे तोंडात टाकले. दोन कागदापैकी एकाची छान घडी करून ती ढुंगणा खाली सरकवली. आणि दुसऱ्या कागदाच्या व्यवस्थित लांब लांब पट्ट्या तयार करण्यात तो गुंगून गेला. त्या कामात कुठेही धसमुसळेपणा नव्हता, पसारा नव्हता. फाडलेल्या सर्व पटट्या एकेक करून तो आपल्या पायाखाली सरकवित होता. त्या छोट्या मुलाचा कामातील नेटकेपणा वाखाणण्याजोगा होता. सर्व कागदाच्या पटट्या तयार झाल्यावर तो छोटा मुलगा उठला. खिडकीच्या जाळीला त्यातील एक पट्टी त्याने अडकवली. धावत्या वाऱ्याच्या वेगाने पट्टी लांब दूर अगदी नजरेआड जावू लागली. कागदाचा तो एवढूसा तुकडा दृष्टीआड होईपर्यंत खिडकीच्या जाळीवर नाक दाबून तो पाहत होता. मग दुसरा.. तिसरा असे करीत तो एक एक कागदाची पट्टी जाळीला अडकवू लागला आणि ती हवेत झेपावण्याची वाट पाहू लागला. उडून जाणाऱ्या प्रत्येक तुकड्यावर जणू काही स्वार होऊन तो आकाश भरारी घेत होता. त्याचे डोळे आनंदाने लुकलुकत होते. आपल्या आपणच शोधून काढलेल्या खेळावर तो जाम खुश होता. गाडी स्टेशनात घुसली कि तो आपला खेळ थांबवीत होता.

'हे त्याला कुणी शिकवले कि त्याची उपजत सहज प्रवृत्ती आहे?' मी एकवार त्या छोट्या चणीच्या आईकडे पाहिले. पण ती मुलाला त्याच्या जगात सोडून आपल्या विश्वात रममाण होती. एकमेकांना स्पेस देण्याचा तो ताणून ओढून केलेला प्रयत्न नव्हता. साधा सरळ जीवन दृष्टीकोन होता. त्यात ना मुलाचे विशेष कौतुक होते ना अति जपणं होते.

मोठेपणी 'कुणीतरी 'बनण्याची क्षमता त्या छोट्या मुलात नक्कीच होती. हे माझ्या दोन दशकाच्या शिक्षकीपेशातील अनुभवावरून मी ताडले होते. त्या 'जाणण्यापासून' ती आई अनभिज्ञ होती. मुलाने आपला खेळ आपणच शोधून काढला होता. आपला खेळ आपणच शोधून काढण्यात, त्यात आनंदाने रमून जाण्यात मुलांची एक उपजत वृत्ती असते. मुलांतील सृजनशीलतेचा तो एक भाग असतो. पण बऱ्याचदा पालक म्हणून, शिक्षक म्हणून, घरातील ज्येष्ठ श्रेष्ठ वडीलधारी मंडळी म्हणून कळत नकळत आपण त्यात खोडा घालतो. 'हं.. हे तसं नाही. असं आहे', हा कसला दळभद्री खेळ शोधून आणलंय', 'गपगुमान घरात खेळा' वगैरे. हे सगळं आपण मुद्दाम करतो अशातला भाग नाही. पण, आपल्यावर झालेल्या संस्कारांचा तो एक भाग असतो. जो आपल्याला नेहमीचा योग्य वाटतो. 'बघ हं नीट, मी दाखवते हं.. हे असं बनवायचं 'असंच काहीतरी सांगून आपण मुलांच्या सर्जनशीलतेचा अंकुरच खुडून टाकतो. असो...

कागदाच्या पट्ट्या ठराविक अंतराने झुकझुक गाडीच्या हवेत सोडण्यात तो मुलगा पार गुंगून गेला होता. आणि त्याचा खेळ, त्याची कल्पना शक्ती, त्याच्या छोट्या विश्वातला मोठा आनंद शोधण्यात मी गर्क होते. एवढ्यात पिवळे झम्मापर घातलेली एक छोटी मुलगी पलीकडच्या आई ताईच्या कळपातून सुटून आमच्या पर्यंत आली.

'आता काय? भांडण, कुरबुर, रडारडी कि मारामारी? 'मी पुन्हा तर्कांच्या राज्यात मुशाफिरी करू लागले. पण माझ्या सर्व तर्कांना मुठमाती देण्याचा जणू चंग बांधून की काय, पण तो छोटा मुलगा हळूच खिडकीपासून दूर सरकला. त्याने आपणहून छोट्या असलेल्या त्या मुलीला वर चढायला मदत केली. आणि जेव्हा ती छोटी मुलगी सर्व पट्ट्या त्याच्या कडून हिसकावू लागली तेव्हा, कुठलाही अभिनिवेश न आणता खिशातील सर्व पट्ट्या त्याने तिच्या स्वाधीन केल्या.

त्या छोट्या मुलाचा तो अति समंजसपणा पाहून मी चकित झाले. हल्लीच्या मुलांत दुर्मिळ झालेला हा गुण! या छोट्या मुळात कुठून आला? शिक्षणातून?... ना.. नाही.. नक्कीच नाही. तो मुलगा जेमतेम पहिलीला असेल. मग कुठून? मी एकावर त्याच्या आईकडे पहिले. त्या बारीक चणीच्या, काळया सावळया, निष्कांचन स्त्रीविषयीचा माझ्या मनातील आदर आता वाढू लागला होता. इतक्या गरीबीतही मुलावर एवढे चांगले संस्कार करणारी ती बाई मला अचानक एकदम ग्रेट वाटू लागली. जे आडात आहे तेच पोहऱ्यात येणार ना. मनात प्रश्नांची मालक तयार झाली. मुलाला सोडून मी आता त्या आईचा विचार करू लागले. 'हिला इतके चांगले संस्कार कोणाकडून मिळाले असतील बरं? हिच्या घडणीत कुणाचा वाटा जास्त असेल? आईचा कि बाबांचा? बाबांचा नक्कीच नसेल. कदाचित मुलगी झाली म्हणून त्याने हिचा दुस्वास केला नसेल कशावरून? मुलांच्या मालिकेत हिचा कितवा नंबर असेल? कदाचित या छोट्या वरील संस्कारात त्याच्या बाबाचेही योगदान असू शकेल. प्रत्येक वेळी आपण आयांनाच का गृहीत धरतो? बाबाही चांगले असू शकतात ना! आपल्या बाबांचं उदाहरण आपण डोळ्यासमोर का ठेवत नाही. प्रश्नांची न संपणारी मालिकाच सुरु झाली.

हल्लीची पिढी स्वार्थी, आपमतलबी आहे. असं सर्वसाधारण सर्वांचं निरीक्षण आहे. मी, माझं, मला मुलांची वृत्ती हल्ली फार संकुचित झाली आहे. टि.व्ही.वरची ती जाहिरात नाही का? ' टिचरनेsss सिखायाss नही  शेअरिंगsss ' म्हणत जाम लावलेला चपातीचा मोठा भाग वडिलाकडून आपल्या ताटात ओढून घेणारा तो मुलगा!  हल्ली शेअरिंग मुलांना शिकवावं लागतं.

आणि माझ्यासमोरिल हा प्रसंग म्हणजे उन्हाच्या काहिलीत होळपळत असताना अचानक वळवाचा पाऊस यावा, तसं काहीसं झालं.

'आता पुढे काय? आणखीन काही नवा खेळ हे पोरं शोधून काढणार कि अम्मीच्या कुशीत शिरून तिला दुश्श्या मारून त्रास देणार किंवा संभाषणात व्यत्यय आणला म्हणून अम्माच्या हातून मोठा धपाटा खाणार?' पण नाही ... तस्सं काहीही घडलं नाही. ज्या सहजतेने त्यानं खिडकी सोडली, कोणताही अभिनिवेश न आणता खिशातील साऱ्या पट्ट्या त्या छोट्या मुलीच्या हाती दिल्या, तितक्याच सहजतेने त्या छोट्या मुलाने ढुंगनाखाली लपवून ठेवलेला भेळेचा दुसरा कागद काढला. खूप वेळ नखांनी दाबून दाबून त्याचे चार आयत तयार केले आणि मग तो त्याच्या होड्या बनवू लागला. साधी होडी, नांगर होडी, राजाराणीची होडी अशा होड्या त्यांनी बनवल्या.

गाडी धावत होती. होड्या डुलत होत्या. 'अगला स्टेशन नालासोपारा.. सभी यात्री ध्यान दे। विरार में ये गाडी प्लेटफोर्म नंबर आठ पे जायेगी। डब्यातील ध्वनिक्षेपक बोंबलू लागला. मुलं, बॅगा घेऊन जो तो पुढे सरकू लागला.

"गणेशाs s s "आईनं मुलाला हाक मारली. मुलानं पटापट बोटी उचलून खिशात टाकल्या व अम्माचा हात धरला निघाला. सवयीप्रमाणे मीदेखील दाराजवळ सरकले. पण माझं सारं ध्यान त्या मुलाकडे लागले होते. तो मुलगा पुन्हा मला कधी भेटेलं न भेटेल. तो कोण? कुठला? कोणत्या शाळेत किंवा कोणत्या इयत्तेत शिकतो?  मागच्या अर्ध्या-पावून तासात मला खिळवून ठेवणाऱ्या त्या छोट्या मुलाची मी जराही चौकशी केली नव्हती. 'नाव काय? 'इतकं देखील साधं विचारलं नव्हतं. असं का झालं असावं बरं?

कारण... कारण त्याचा खेळ, त्याची कल्पकता, त्याच्याठायी असलेला समंजसपणा,  त्याचा बालसुलभ आनंदाच्या कल्पना या सगळयांत मी गुंतून पडले होते. अनावश्यक प्रश्नांची सरबत्ती करून मला त्या छोट्या मुलाची तंद्री भंगू द्यायची नव्हती कारण त्याच्या भावविश्वाचा मी नकळत भाग बनले होते.

पण, आता बसडेपोच्या दिशेने जाताना मनाला मात्र चुटपूट लागून राहिली. मी पुन्हा एकवार मागे पहिले. प्लेटफॉर्मच्या विरुध्द दिशेने आपल्या अम्माचा हात धरून मजेत उडया मारीत तो चालला होता. अगदी मजेत.. आरामसे . . .

आणि आकाशात लककन वीज चमकावी तसा एक विचार मनात डोकावला. गेली अनेक वर्षे मी सरकारी खात्यात काम करीत आहे. तिथली एकंदर शिक्षणप्रणाली, अनास्था, प्रशासकीय व्यवस्थेचा मी अगदी जवळून अनुभव घेतला

आहे. अनेक कोवळ्या जीवांची कल्पकता, सर्जनशीलता कुरतडून टाकणारी आपली सरकारी प्रणाली या गुणी, गरीब, मुलाचा बळी तर घेणार नाही ना? क्षणभरापूर्वी मला नितळ, निखळ आनंद देणाऱ्या मुलाच्या भवितव्याच्या केवळ या एका विचाराने मी अस्वस्थ झाले .

या घटनेला आज इतके दिवस लोटून गेले, तरीदेखील तो समंजस मुलगा आणि त्याला मुक्तपणे बागडू देणारी छोट्या चणीची ती आई अजूनही मनपटलावर राज्य करीत आहे.

मुलाला मोकळीक देणे म्हणजे काय? हे शिकवणाऱ्या अर्धशिक्षित आईची ही कथा.

-बेर्नादेत रुमाव (बोरीवली)

(बेर्नादेत रुमाव या व्यवसायाने शिक्षिका असून उत्तम अश्या ललित लेखिका आहेत. त्यांचं "चिमण्यांच झाड हा ललित लेख संग्रह प्रकाशित झाला आहे. "ख्रिस्तायन" तर्फे त्यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा. – संपादक)

# "ती"

रविवारॅ हांश्यापारा नवापुर बीचवर वॉकला जाना नेहमीसा झालॅ. माये, मा बाहाशे आन आजूबाजूशे मिळॉन ८/१० पोरे नवापुर बीचवर फुटबॉल/ क्रिकेट खेळते हात तव आमॅ दोगॅ (मॅ आन माई नवरी) राजोडीला त्या वृद्धाश्रमापोत जावॉन परत येत्याव. जाताना आन येताना आपल्या अडशे बरेशशे पोरे फुटबॉल खेळताना बगॉन खुब बरा वाटातॅ. खुबशे लोक (सिंगल, कपल) आमश्या हारकास हाकोटसा हेवी खालेला हळका कऱ्या करतान वॉकला येत्यात. बरॉश्यो लेडीज ग्रुपमिनॅ वॉक करताना दिखात्यात (तिगाळा आपुन बॅलाशक समज्यासा, यायॅ नवरॅ तडॅ समुद्रोरती पोरांवरती लक्ष द्या उबॅ हात आन ते जानाऱ्या येनाऱ्यांना स्कॅनिंग करीत बीचशी मजा अनुभवीत हात)

अहयास नेहमीश्या वातावरणामिनॅ आमॅ दोगॅ काल वॉक करीत राजोडी दिशेला जातोतॅ. ऑड्यात समोरनॅ आमश्या दिशेला एक कपल येताना दिखला. लांबनॅस वाटला. यी "ती" तॅ नाय? जवळ आले तहा ओळखिला. "ती"स हाय.. बाजूनॅ जाताना एकमेकायी बगॉन न बगिल्या हारका कॅला. एक क्षण नुसतॉस एक ठॉकॉ चुकल्या हारका झाला.. आमॅ राजोडी दिशेला निघाले. मांगॅ डोकायाशी तीव्र इच्छा मॅ दाबॉन टाकिली.

कॉलेजमिनॅ असताना "ती" डि. एड करतोती, आन रोज हाकोटे ७.१५श्या ट्रेनला अहयाशी. नेमकी तियी बस मिनने उतऱ्यासा टाइम ॲडजस्ट करॉन रोज ती उतरली गा तिया मांगॅ मांगॅ जाना सुरू झाला.. तिया एका ओळखीया मैत्रिणीमार्फत ओळख करॉन घेतली. मग तिया कॉलेजला जाना येना सुरू झाला. कातॅ लेक्चर बंक करॉन, कातॅ रजेदिहा

एकस्ट्रा लेक्चर हात अहो बाहानॉ करॉन आमसा भेटना वाढला. आमॅ प्रेमात पडलॅ. पन नियतीला आमसा प्रेम मान्य नॉता. आमॅ अलग झालॅ. आन आज तब्बल २० वहारानंतर...

राजोडीवरनॅ आमॅ परत आले. नवापुरश्या किनाऱ्यावरती सनसेट बगील्याशिवाय घरा जासा नाय यी पन आमसा नेहमीसा. पोरे पाण्यामिने खेळातोतॅ त्यांना बॉलव्यादो आमॅ थांबले. ऑड्यात "ती" "त्या" बरोबर समोरनॅ आली. या वॅळॅला त्या दोगांबरोबर बी एक कपल हॉता जा आमश्या ओळखीआ हॉता. ते आमश्या मॅरॅ थांबले. "ती" पन त्या बरोबर थोडीशी लांब (१/२ मीटर) थांबली. "कला, कॉड्या वहरोर?" दोगीआ हिंगुटात हिंगुट गॅला. मा लक्ष त्या बोलन्योर नॉतास. सूर्य सुमुद्रामिने डुब्या लागलोतॉ. त्या लाली सगळ्या ठिकाणी पसरलोती. आन आमॅ दोगॅ एकमेका मॅरॅ एकमेका नजर सॉरॉन उबे होते. "डॅड, घरा जाव सल." "कला, पोरी ओडी भोटी झालीआ?" "तिने" मा पोरीवरती कौतुकानॅ बगिला..

पोरे सायकलवर पुडॅ निंगाले. त्यांना कवर करीत आमॅ मांगनॅ गाडीवरती हळूहळू निंगाले. "संजू, तूआ लक्षात आला गा?"

"का?"

"आपुन मा मैत्रिणीबरोबर ऊबी होते तिगाळा त्या जोडीला ता कपल हॉता ता, ता लांब कय ऊबी होता, मायित हाय गा?"

"का मायित, कदाचित त्यांना बोल्यासा नाहॅदॅ?"

"नाय रॅ, त्याला २० वहारा अगोदर मॅ नाय हांगिलता".....

**सायमन फिलिप रॉड्रिग्ज, आगाशी, क्रॉस नाका**

# तो परतलाच नाही....

तारीख १६जानेवारी २०१२. संध्याकाळी सेल वाजला, ऑफिसच्या डेस्कवरून फोन होता म्हणून घाईत असतानाही तो घेतलाइटलीतील कोस्टा . कोन्कार्दिया बोट बुडीत प्रकरणात वसईतील १० जण आहेत असा मेसेज मिळाला. पूर्ण तालुक्यातून ती घरे शोधून काढणे ती ही अवघ्या काही तासात शक्य नव्हते...तरी सौर्स लावले . रात्र गेली... दुसऱ्या दिवशी सकाळी माहिती मिळाली, ९ जण ठीक आहेत केवळ १ अजूनही बेपत्ता आहे. नायगावतील मरियमनगर येथील रसेल रिबेलो.... केवळ त्रोटक माहितीवर मी पोहोचायचे ठरवलेजेव्हा मी पोहोचलो . तेव्हा इतक्या मोठ्या भागातून एक घर शोधणे ते ही विनापत्ता कठीणच... तरी विचारत, माहिती देत ते घर गाठलेच... परिसरात सन्नाटा होता ..अजून मिडिया पोहोचली नव्हती .

त्या घरी जावून प्रश्न करणे वा अनोळखी इसमास माहिती देणे दोन्ही बाजूने मी विचार केला... हरवण्याचे दु:ख फार वेदनादायक असतेत्यातच मिडीयाला अश्याप्रसंगात माहिती देण्यास सहसा कुणी तयार होत . मानसिक .नाहीत स्थिती, लोकांचा राग आणि जे काही मिळेल ते हटके असेल या प्रयत्नात समोरच्याचा रोष पत्रकार ओढवून घेत असतातमाझे प्रश्न काय असतील हा . विचार करीत मी उभा असताना ८/१० माध्यमाचे प्रतिनिधी पोहोचले. आता हे गोंधळ घालणार. त्यांच्या बरोबर राजकीय नेतेही होते... त्यांनी शहाणपणा दाखवत प्रथम त्याच्या कुटुबियांना भेटण्याची परवानगी मागितली. ते तयार झाले.... संपूर्ण घर मिडीयाने भरून गेलेअनेक प्रश्न .. एकाच वेळी .. त्यामुळे

रसेलचे आईवडील गोंधळून गेले... काय बोलावे त्यांना सुचत नव्हते. भीती आणि मुलाच्या हरवण्याचे दुख याचे ओझे त्यांच्या खांद्यावर जाणवत होतेते आ ..म्हाला फेस करू शकत नव्हतेअपंग वडील आणि बोलण्याच्या .. मनस्थितीत नसलेली आई... जवळपासचे काही नातेवाईक... अडखळत आणि रडतच ती उत्तरे देत होती. माहिती नीट मिळत नव्हती म्हणून प्रश्न थांबवलेसर्व . प्रतिनिधी शांत असले तरी माहिती देताना काहीही नीट समजत नव्हते. असे झाले मग तसे का झाले? तो तेव्हा आला होता मग लगेच कसा पोहोचला? मोठा भाऊ कसा संपर्कात आहे? अनेक शंका त्याचे निरसन करणे तिला त्यावेळी जमत नव्हते. हुंदके देत ती फक्त एकच म्हणाली," काहीही करा पण माझा मुलगा मला परत मिळवून द्याआम्ही सर्व साहित्य बाजूला ठेवून त्यांना " घरच्यासारखे समजावू लागलो.तो एक चांगला निर्णय होता . त्यांच्याबरोबर प्रथम परिस्थिती जाणून घेतली. त्यांना बोलायचे होते पण ते गोंधळलेले होते. अश्यावेळी त्यांचे एक नातेवाईक पुढे आले, त्यांनी सर्व माहिती देण्यास सुरवात केली अगदी इटालीतील सरकार किती मदत करते .यापासून रसेल बाबतहीमग ... ते पाहून त्याची आईही बोलू लागली.प्रश्नाची आवश्यकता नव्हती . भावना थेट ओठावर येत असताना त्याची गरज भासली नाहीतो ती ..तिचा आक्रोश मोठा होता ... ओरडून व्यक्त करत नसली तरी त्याची सहज जाणीव झाली.... दुसऱ्या दिवशी फ्रंट पेज बातमी लागली तरी... आज या घटनेला २ वर्षे झालीअजून तो परतलाच .. नाही..... आतापर्यंत त्यांनी हे मान्य केले असेल तो आता नसावा.. पण हरवणे इतके वाईट असते एक मन सांगत असले तरी दुसऱ्याच क्षणी तो असेल कुठेतरी.. असे सांगून पुन्हा अंधुक आशा जिवंत होतात.. प्रत्येक क्षणाला मरून पुन्हा जगण्याची शिक्षा काय असते ते ह्या प्रकरणात सहज लक्षात येईल... अश्या वातावरणात अपेक्षित माहिती काढून त्यावर स्टोरी करणे हे कौशल्य असले तरी हे कसब जमणे कठीणच.... लोकल बॉम्बस्फोट, मुंबई अतिरेकी हल्ला, प्रत्येक वेळी वसईतल्या त्या त्या कुटुंबास भेट देवून माहिती काढणे म्हणजे समोरच्या व्यक्तीकडून चांगल्याची अपेक्षा धरूच शकत नाहीत. आपला इगो, राग आणि लाज सर्व बाजूला ठेवून ती माहिती संकलित करून सर्वसामान्यापर्यंत पोहोचवणे हाच उद्देश असला तरी त्यांना भावनिक आधार ही सुद्धा आमचीच जबाबदारी.... मात्र तीच कसोटी असते माध्यमांसाठी आणि त्या पिडीतासाठीही.....

**अमर म्हात्रे.**

# आठवण

आजकालचे जीवन खूप धावपळीचे-दगदगीचे बनले आहे. कुणाकडे कुणासाठी वेळ नाही. जिथे जिवंत असलेल्या लोकांच्या भेटीगाठी होत नाहीत तिथे परलोकी गेलेल्यांचे स्मरण होणे ही फार अवघड गोष्ट आहे. ज्या कोणाच्या कुटुंबातील व्यक्ती, जवळचे नातेवाईक, मित्र आणि इतर प्रिय व्यक्ती मृत झालेल्या असतील ते सर्वच जन याला अपवाद असू शकतील परंतु आपल्या नात्याच्या परिघाबाहेर असलेल्या आणि कधीकाळी सानिध्यात आलेल्या मृत लोकांची आठवण होणे तसे दुरापास्तच.

मागच्या महिन्याची घटना. महापालिकेच्या निवडणुकीच्या मतदानाचा दिवस. मतदानाच्या 'स्लीप' वाटण्यासाठी आमच्या वार्डामधील मतदार यादी चाळत बसलो होतो. बघता बघता एका नावाकडे सहज लक्ष गेले, 'मायकल लोपीस' हे ते नाव अन क्षणार्धात मन भूतकाळात गेले. मायकल काकांना गेल्याला दोन-तीन वर्षे झाली होती. मी माझ्याच मनाला प्रश्न केला, मागच्या दोन-तीन वर्षात कितीदा मी त्यांची आठवण काढली. माझ्या मनाने दिलेलं उत्तर मलाच त्रासदायक झालं. मला अपराध्यासारखे वाटू लागले. मी त्यांच्या नावावर फुली मारून मतदार

यादीतील पुढील नावे वाचू लागलो. काही पाने उलटल्यावर मी माझ्या आजोबाच्या नावाजवळ येवून थांबलो. दोन महिन्यागोदर ते देवाघरी गेले होते. त्यांच्या आठवणीने माझे डोळे पाणावले. डोळयातील अश्रू रुमालाने टिपत मी त्यांच्या आठवणीना उजाळा दिला, त्यांच्याही नावावर फुली मारून मी पुढे चाळत राहिलो. परिसरातील अनेक मृत स्त्री-पुरुषांची नावे डोळ्यासमोर आली अन प्रत्येकाचे स्मरण झाले. त्यांच्याबरोबर घालवलेल्या काही महत्वाच्या प्रसंगाची आठवण आली. का कुणास ठाऊक वाटले की ही मतदारयादी आज हातात नसती तर ह्या सर्व मृत लोकांचे स्मरण झाले असते का? नक्कीच नाही. ते आठवणीच्या पडद्याआड कायमचेच गेले असते।

मी आता मनाशी ठरवलंय, कधी एकांतात, कधी प्रवास करीत असताना तर कधी मोबाईलवर गाणी ऐकत असताना थोडा वेळ का होईना आपल्या गावातील, आजूबाजूच्या परिसरातील व ऑफिसमधील ओळखीच्या मृत व्यक्तीची आठवण करायची, त्यांच्याबरोबर घालवलेल्या काही महत्वाच्या प्रसंगाला उजाळा द्यायचा अन जमलंच तर थोडी त्यांच्यासाठी व त्यांच्या कुटुंबासाठी प्रार्थना करायची. अन्यथा मतदार यादीत फुली मारून "कायमचे बाद" केल्यासारखे तेही कायमचे आपल्या जीवनातून बाद होवून जातील. चला तुम्हीही प्रयत्न करून बघा. किती मन हलक होईल तुमचं. जिवंत माणसाची आठवण कधी कधी त्रासदायक होते पण मला आशा आहे अशा जवळच्या मृत व्यक्तीची आठवण मन जिवंत करील.

पाउस, माणुसकी जागवणारा........

आज सकाळची घटना. लोअर परेल स्टेशनवर गाडीतून उतरण्याची वेळ आणि त्याचवेळी मुसळधार पाऊस सुरु झाला. आधीच उशीर झाला होता. चालत जान्या ऐवजी छत्री उघडून जवळच असलेल्या शेअर टाक्सी च्या रांगेत उभा राहिलो. बराच वेळ झाला तरी टाक्सी काही आली नाही. पावसाचा जोर वाढला होता, सहज मागे वळून पहिले तर माझ्या मागे रांगेत उभा असलेला एक गरीब माणूस छत्री नसल्याने मुसळधार पाऊसात चिंब ओला झाला होता. मी लागलीच त्याला म्हटले "मित्रा, माझ्या छत्रीखाली ये." त्यावर तो गरीब माणूस उत्तरला "साहेब, छत्री छोटी आहे, मला घेतल्यास तुम्हीही भिजून जाल". का कुणास ठाऊक माझ्या तोंडातून लागलीच शब्द बाहेर पडले "ये मित्रा ये, छत्री लहान असेल पण मन मात्र मोठे आहे". चेहऱ्यावरील पाणी हाताने पुसत त्यांनी मंद स्मित केले आणि तो छत्रीत आला. अंगाला पाणी लागू नये म्हणून आम्ही दोघांनीही छत्रीखाली अंग चोरून घेतले होते. पाउस जोरदार कोसळत होता, अंग पावसाने भिजले होते अन मनही भिजत होते जागे झालेल्या माणुसकीने.

थोड्या वेळात टाक्सी आली, त्यात एकच सीट होती. माझ्याकडे छत्री असल्याने मी त्याला पुढे पाठवले. जाताना त्याने मला 'धन्यवाद' दिले अन तो पुन्हा मंद स्मित देवून निघून गेला. मी

मनाशीच विचार करू लागलो तो कोण? कुठला? काहीच माहित नाही, त्याचे अन माझे नातेही माहित नाही. तो निघून गेला होता पण त्याची क्षणिक भेट आजच्या धावपळीच्या जीवनात कुठेतरी कोमेजलेला माणुसकीचा अंकुर उगवून गेली होती. मी मागे वळून पाहीले म्हणून भाग्यशाली ठरलो होतो. जे त्याच्या मागे उभे राहून त्याला उघड्या डोळ्यांनी भिजताना पाहत होते ते कमनशिबी ठरले होते. असो, पाउस तर रोजच येणार आहे, एक दिवस अंकुर त्यांच्याही मनात फुटेल.

सचिन मेंडिस

# संस्कृती□रक्षक

फेलिक्स डिसोजा

**1 .**

अचानक कोणीतरी झोपेतून जागा झाला आणि त्याला पडलेले भयाण स्वप्नं तो मोठ मोठयाने ओरडत सर्वांना सांगु लागला, ‘जागे व्हा जागे व्हा’, ‘कामाला लागा’ , ‘आपल्या संस्कृतीला धोका आहे,’ ‘संस्कृती वाचवली पाहिजे’, संस्कृती टिकली पाहिजे . नव्यानेच कानावर काहीतरी नवे आदळल्यासारखे झोपून झोपून मरगळयागत झालेले सर्व अगदी ताजेतवाने होतात . आणि एकच गलका सुरू होतो . ‘आपली संस्कृती धोक्यात आहे’, ‘धोक्यात असलेली संस्कृती वाचली पाहिजे’ .

मंग कोणीतरी त्यांच्यातला स्व खर्चाने सभा बोलावतो . सभेत सर्व उत्साहाने गर्दी करतात . प्रत्येकांची स्वतःची अशी काही स्वतंत्र मते वगैरे नसतातच तरी प्रत्येकाला काहीना काही बोलायचे असते . काहीना काही करण्याची इच्छा असते . पण नेमकं काय करायचं हे कोणालाच सुचत नसतं .

मंग कोणीतरी कोणाच्यातरी कानात हळूच कुजबुजतो . अरे□संस्कृती वाचवायची म्हणजे नक्की काय वाचवायचं □तेवढयात कोणीतरी काहीच न बोलता येत नसल्यामुळे चक्क ओरडतो . भाऊ□संस्कृती म्हणजे काय रे □सर्व एकमेकांच्या तोंडाकडे उत्तराच्या अपेक्षेत उत्साहाने पाहत राहतात .

क्षणभर शांतता पसरते . त्या शांततेला जोडून अजून थोडी शांतता पसरते . त्याला जोडून अजून थोडी अशाप्रकारे लांब लांब होत गेलेली शांतता अगदी असहय झाल्यावर ज्यांनी स्वखर्चाने सभा बोलावलेली असते तो उठून उभा राहतो आणि म्हणतो□इतकं गंभीर व्हायची काही गरज नाही . आपण विषयांतर करायचं नाही□आपलं उददिष्ट एकच 'संस्कृती वाचवायची' . बाकीशी आपलं काही देणं घेणं नाही . आपलं एकच ध्येयं "संस्कृती बचाव" . सर्वजण प्रश्नांची ब्याद टळली म्हणून 'वा साहेब, काय मुददा मांडला, म्हणत टाळया वाजवत माना हलवतात . मग कोणीतरी फूटी आणि पॅटसि घेऊन येतो आणि सभा संपते .

**2** .

"मंला वाटतं आपण घाई करू या नको" , बोलत बसलेल्या दोन मित्रापैकी एक मित्र म्हणाला .

'तु फार विचार करतोस ,अरे काही तरी चटपटीत, कुरकुरीत असायला हवं', 'हे बघ या

कुरकु यासारखं,' हातातले कुरकुरे त्याच्यापुढे करत दुसरा मित्र म्हणाला .

'अरे पण याचा उपयोग काय ? , नुसते लोक जमतील ,लोकांना जमवुन काय होणार आहे □नाहीतरी एरव्ही आपल्याकडे सणसमारंभाला लोक जमतातच ना □मग यात नवीन काय आहे .

"नवीन ?" खिदळल्यासारखा हसत दुसरा मित्र म्हणाला. आता नवीन काय यात ? अरे आपण संस्कृती रक्षणाचे शिलेदार□आपण परंपरेचे पाईक . आपल्याला आपली संस्कृती प्रिय . मग सगळं जुनंच नको का □मग नवीन कसं काय असणारय □आणि हा तुला नवीन हवंच ना मग आपण डिजे लावणारंच ना मग□ असे म्हणत त्याने टाळी घेण्यासाठी हात पुढे केला .

"तसं नाही अरे सारं ब्रम्हांड अस्थिर . मानवी जीवनही याला अपवाद नाही . इथे सतत सगळं बदलणारं आहे . कालची मुल्ये आज राहिली नाहीत . असं काय आहे कालचं जे आज आपलं म्हणून शिल्लक आहे . रक्षण करायचं म्हणजे नक्की कशाचं करायचं □ आणि हे सतत असं बदलणारं मग पालन तरी नक्की कशाचं करायच □□पहिला मित्र शांतपणे विचारपूर्वक असंच काहीतरी म्हणत होता .

दुसरा त्याला समजावत म्हणाला, 'तु फार कठिण आहेस ,विचार फार करतोस न गोंधळून जातोस . अरे असा गोंधळ झाला ना सरळ दुर्लक्ष करायचं असतं . नाहीतर झोप नीट लागत नाही . हे बघ आपल्या हलक्या फुलक्या आयुष्यात असले जड जड विचार हवेतच कशाला ?'

**3** .

संशोधकाच्या शोधनिबंधातून.........

एका फुलस्केप कागदावर दोन्ही बाजूला समास आखून तो वळणदार टपो □या अक्षरात लिहू लागला .

culture

\'*noun* \

: the beliefs, customs, arts, etc., of a particular society, group, place, or time

: a particular society that has its own beliefs, ways of life, art, etc.

: a way of thinking, behaving, or working that exists in a place or organization (such as a business)

संस्कृतीत कला□समजुती□प्रथा□शोध□भाषा□तंत्रज्ञान आणि परंपरा यांचा समावेश होतो .

राष्टाची □राज्याची □समाजाची विशिष्ट अशी संस्कृती असते. मानवी जीवनशैली□आचार विचार □भाषा □व्यवसाय □नीतिसंबंधातल्या परंपरा□रूढी यांना एक इतिहास असतो आणि हा बदलाचा इतिहास असतो.संस्कृतीतले □मानवी जीवनातले हे बदल आपण थोपवू शकत नाही.हा बदल घडून येण्यात शिक्षण□विज्ञान□इतर भाषेशी आलेला संपर्क□भौतिक साधनात होणारा बदल याबरोबरच मानवाचा अधिकाधिक सुसहय जीवन जगण्यासाठी असलेली धडपड हे घटक परिणामकारकरित्या प्रभावी ठरत असतात. बदल हा निसर्गाचा स्थायीभाव असतो तसाच तो मानवी जीवनाचाही असतो .

बदलत्या काळात जर आपण जुनीच मल्यं घेऊन बसलो तर माणूस□समाज नष्ट होईल अशी परिस्थिती आहे.गेल्या **20 22** वर्षात काळाचे तडाखे इतके जोरदार होते की जगभरातील राष्टे □समाज आणि त्याच्या संस्कृती मुळासकट हादरलल्या.छोटी छोटी खेडीही या तडाख्यात ढवळून निघाली. या बदलानं संस्कृती परिवर्तीत होत होत्या.सगळया जगाची एक अशी संस्कृती निर्माण होऊ लागली आणि स्थिरावली.

झगमगाटी प्रदर्शन आणि डोळे दिपवणारा लखलखाट आजच्या काळाचं खणखणीत वाजणारं नाणं आहे. या लखलखाटात दुय्यम तिय्यम दर्जाच्या कृती□ पदधती□ समज□ विचार □कल्पना यांना पहिल्या रांगेचा मान मिळत आहे. काल जे विशिष्ट समाजासाठी गौरवशाली म्हणून होतं ते कालबाहय झालं. रोज नव्यानं निर्माण होणारं ज्ञान आजच्या काळाचा किवर्ड आहे.रोजचे नवीन शोध माणसाच्या जीवनात धुमाकूळ घालत आहेत.

माणुस हा संस्कृतीचा निर्माणकर्ता आणि त्याचं मानसिक□ आर्थिक□ सामाजिक साफल्य हा केंद्रबिंदु होता. ती व्यवस्थाच आता उलथीपालथी झाली आहे.माणूस परिघाबाहेर फेकला गेला आहे.बाजार आता केंद्रस्थानी आहे. भौतिक सुखाच्या एवढया गोष्टी मुबलक आहेत.लुटत राहणं□ चैन करणं□ चंगळ करणं एवढंच आता काम उरलं आहे. जे काय नव्यानं येतंय ते आपलं होत आहे. समुहाच्या समाजाच्या रोजच्या जीवनाचा भाग होत आहे.एकसाचीपणा आणि सपाटीकरणाचा झंझावातात समाजाच्या एकजीनसीपणाला आणि संस्कृतीच्या गाभ्याला हादरे बसत गेले.

या सा □या प्रक्रियेत सतत बदलत आपले सुख□ दुःखे□ स्वप्नं □आकांक्षा□ नामुष्की□ पराभव हे सगळे साजरे करीत माणूस त्याच्या जगत राहण्याच्या चिवटपणासकट उरतोच.समुहावर त्याचा अजुन विश्वास आहे. त्यातून नव्याने तो काही कल्पना□ पदधती□ निष्ठा □एकूण जगण्यासाठी आवश्यक असलेला विश्वास सातत्याने निर्माण करीत असतो.माणसाच्या या संस्कारक्षम जाणिवा जीवंत ठेवणे आवश्यक आहे. संस्कृती म्हणजे संस्काराची कृती असे मानले तर संस्कार जोपासणा□या माणसाच्या समाजाचं रक्षण म्हणजे संस्कृतीचं रक्षण असे म्हणता येईल.

मनोगत ः

काळ बदलतो तसे आपण बदलणारंच .प्रत्येक काळाचं त्या काळात टिकून राहिलेलं काहीना काही असतंच . त्याला अस्सलपणा असतो . त्याला इथल्या मातीचा वास असतो .अंगभूत वेगळेपण आणि परंपरेचं सत्व पचवून नव्याशी झगडत त्याला स्वतःची अशी झळाळी आलेली असते . काय आहे असं आपलं म्हणवणारं □

गावात आलेल्या गिरणीसकट तुझं जातं गेलं

तेव्हा वाटलं तुझ्या कष्टानं भरडलेल्या देहावर

थोडं मांस चढेल स्फुरतील तुझ्या कंठातल्या ओव्या

पण आटत गेल्या तुझ्या ओव्या

न इथल्या भाषेचं संगीत संपलं .

ज्या भाषेत गाणं आहे त्या भाषेत ओलावा आहे .या ओलावा भाषेतून नात्यात पाझरतो .आणि नात्याला बहर येत असतो .भाषेतला ओलावा संपला की नाती शुष्क कोरडी होत जातात .म्हणून भाषा जीवंत ठेवणे फार महत्वाचे ठरले आहे . बाहय प्रभाव पचवत अधिकाधिक प्रगल्भ होणारी तसेच कमालीची लवचिकता स्विकारणा□या भाषाच या काळाच्या कसोटीला उतरून तग धरू शकतील .अन्यथा इतर भाषेचा प्रभाव नाकारात कर्मठपणा दाखवणा □या भाषेचा अंत समिप आहे .आपल्या इथल्या बोली भाषेतलं लेखन प्रसिदध होत आहे ही फार महत्वाची आणि आवश्यक गोष्ट आपल्याकडे गंभीरपणे चालू आहे .आपल्याला आपल्या बोलीचा अभिमान असायलाच हवा आणि तो टिकायला हवा .

इथल्या मातीत अजून सृजनाचे तृण उगवतात . निर्मितीची आसक्ती अजून इथली माती विसरली नाही .मातीचा गुणधर्मच मुळात आधार देण्याचा आणि उदरातून नवे कोंब उगवत जगण्याची आशा प्रवळ करण्याचा .या मातीशीच आपलेपण तेवढे शिल्लक आहे .हे आपलेपण तरी पुढे कितपत उरेल .झाकल्या गेलेल्या आणि लिलावात बोली लागलेल्या जमिनी धावून धावून कुठवर धावणार□ जमिनी नष्ट होत आहेत . आपल्याला अभिमान वाटावा असे काय आहे आपले .

आपण संस्कृती बचावाचे नारे दयायचे आणि त्याच्या रक्षणासाठी आपल्याला वेगळयाच मातीतले नेते लागतात . आपल्या मातीतले नेते आपल्याला आपले वाटत नाही . आपल्या एकत्र येण्याच्या तळमळी मॅनेज केलेल्या इव्हेंटनंतर विरून जातात . आपल्याला आपले असे जे टिकवायचे होते ते टिकवणे म्हणजे वस्तुसंग्रहालय उभे करणे असे असेल□ तर आता उत्साहाने आपण काही करू आणि भविष्यातील ती अडगळ म्हणूनच उरेल□ अशीच शक्यताच जास्त आहे .

आपलं असं एकजीनसी नेतृत्व नाही . व्देष□ मत्सर□ इतरांना कमी लेखण्याची खरं तर आपली परंपरा . काळ बदलला□ आपण अंतःबाहय बदललो .पण या परंपरेला आपण अजून चिकटून आहोत . समाजाच्या एकीचं प्रदर्शन करायला आपल्याला आवडतं .पण समाजातून समर्थ राजकीय पर्याय आपण निर्माण करू शकत नाही .

संस्कृतीच्या गोष्टी करणं आणि ती वाचवणं असं काहीच नसतं . असतं ते निष्ठेने स्वाभिमानाने जगणं . संस्कृतीच्या गौरवाच्या गोष्टी करायच्या आणि आपल्याला आपल्या हिरव्या कवेत घेणा□या निसर्गाचे लचके तोडायचे□

आपले सांस्कृतिक संचित असलेले आणि भविष्यात आपल्या पिण्याच्या पाण्याचे मुळ स्त्रोत ठरू शकणाऱ्या बावखालाच्या कचराकुंडी होऊ दयायच्या रीती करणाऱ्याकडे तुच्छतेने पाहायचे . हा विरोधाभास आपण टाळू शकलो नाही . त्यामुळेच आपल्या सास्कृतिक अस्मितेचा पायाच भुसभुशीत होत जाऊन हाती काहीच लागत नाही .

सुशिक्षितांच्या नवा युगाचा प्रतिनिधी करणारा नवे परिवर्तनवादी युवक पुढे येऊ शकतील अशा शक्यता निर्माण करायला हव्हात . सांस्कृतिक संचिताचा गौरव आणि राजकीय परिवर्तनाची आस आपण धरायला हवी . हे सारे काळाच्या दृष्टीने महत्वाचे मानले तर या दोन्ही बाबतीतला समन्वय आणि एकमेकांच्या विश्वासाने सांस्कृतिक अस्मितेबरोबरच आपली स्वतःची अशी राजकीय अस्मिता आपण जागी करू शकू . आणि मला वाटतं या सर्व तळमळीचं चळवळीचं अंतिम ध्येय हेच असावे . हेच असायला हवे .

.......................................................................

# पाप की पुण्य

साध्या आणि सुंदर अशा जीवनातील काही गोष्टी अचानक अवघड बनू लागतात आणि काहीतरी भयानक घडणार असल्याची एक पुसटशी कल्पना आपल्या मनात येऊन जाते. माझ्या जीवनात काहीतरी भयानक घडणार असल्याची चाहूल मला आधीच लागली होती पण हीच भयानक गोष्ट माझ्या जीवनाची शोकांतिका बनून जाईल ह्याचा मी कधी विचारही केला नव्हता. जीवनात घडणाऱ्या सर्व वाईट गोष्टी नियतीच घडवून आणत असते असं नाही तर काही गोष्टीसाठी आपण स्वतःच जबाबदार असतो. माझ्या बाबतीत गेल्या महिन्यात जी शोकांतिका घडली होती त्याला सर्वस्वी मीच जबाबदार होते. फक्त मी. त्या रात्री मनात आणलं असतं तर कदाचीत ही शोकांतिका मी नक्कीच टाळू शकले असते पण त्यावेळी मी मोहाच्या जाळ्यात पूर्णपणे गुरफटून गेले होते. त्यावेळी मोहरूपी सैतानाबरोबर झालेल्या संघर्षात मी पूर्णपणे नाउमेद झाले होते. मोहावर विजय मिळवणं हे सोपं नसतं. जर ते सोपं असतं तर जगात पाप नावाची गोष्ट जन्मालाच आली नसती.

अमितशी लग्न झालं त्यावेळी मी फक्त बावीस वर्षांची होते. हे लग्न माझ्या इच्छेविरुद्ध होणं हीच ह्या संपूर्ण शोकांतिकेची सुरुवात होती. मी पहिल्यापासून एक आज्ञाधारक मुलगी म्हणून जीवन जगले. त्यामुळे आईवडिलांच्या इच्छेविरुद्ध जाऊन त्यांना दुखवणे मला कधी जमलेच नाही. माझ्या आईवडिलांनीही कधी माझी इच्छा जाणून घेण्याचा प्रयत्न केला नव्हता, निदान माझ्या लग्नाच्या वेळीतरी त्यांनी ती संधी मला द्यायला हवी होती....

लग्नाबाबतीत प्रत्येक मुलींची काही स्वप्नं असतात. आपला होणारा नवरा कसा असावा, कसा दिसावा ह्याचं चित्रं त्यांनी मनातल्या मनात रेखाटलेलं असतं. त्या चित्रातील तो तरुण त्यांच्या स्वप्नातला राजकुमार असतो. कधीतरी तो राजकुमार घोड्यावर स्वार होऊन येतो आणि त्या मुलीला अलगद उचलून घोड्यावर बसवतो व दूर देशी घेऊन जातो. मलाही वाटायचं माझाही राजकुमार घोड्यावर बसून येईल व मलाही दूरदेशी घेऊन जाईल. पण तसं घडण्याआधीच मला अमितच्या गळयात बांधण्यात आलं. लग्नाच्या दिवशी अमित घोड्यावर स्वार होऊन आला त्या दिवशी मला एक गोष्ट समजली, लहानपणापासून आई वडिलांच्या आज्ञेत वाढलेल्या मुलीला अशी स्वप्नं पाहण्याचा अधिकार नसतो आणि असलाच तरी ती स्वप्नं पूर्ण होतील ह्याची शाश्वती नसते.

मी मयुरी पाटणकरची, मयुरी कदम झाले त्यादिवशी मला कळून चुकलं, लग्न करणं हा खूप मोठा त्याग असतो. सासरी राहणं हे एवढं मोठं आव्हान असेल ह्याचा कधी विचारही केला नव्हता. माझ्या सासरची सर्व मंडळी प्रेमळ असली तरी त्यात माहेरच्या प्रेमाचा ओलावा नव्हता. आईचं घर सोडल्यानंतर एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली की माझ्यातील एका खट्याळ मुलीची जागा आता एका जबाबदार स्त्रीने घेतली होती. मी माझ्या सासरच्या घरात वाटेल तेवढा वेळ झोपून

राहू शकत नव्हते, मी माझा आवडता पायजमा घालून घरात आळशासारखे फिरू शकत नव्हते, पुस्तक वाचत पलंगावर सबंध दिवस लोळू शकत नव्हते थोडक्यात सांगायचं तर आता मी माझ्या वडिलांची राजकुमारी राहिले नव्हते.

अमित माझ्यावर खूप प्रेम करायचा. तो जरी कधी माझ्या स्वप्नातला राजकुमार बनू शकला नाही तरी एक नवरा म्हणून मी त्याला पसंद केले होते. अमित जसा माझ्या जीवनात आलेला पहिलाच मुलगा होता, तशीच मीसुद्धा अमितच्या जीवनात अवतरलेली पहिलीच मुलगी होती. त्याच्या सहवासात राहून मलाही त्याच्याविषयी आवड निर्माण झाली होती. त्या आवडीचे प्रेमात रुपांतर झालेही असते जर अमितने कधी माझ्या भावनांचा विचार केला असता.

अमित एका प्रायव्हेट कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करीत होता. शाळेपासूनच अभ्यासू विद्यार्थी म्हणून त्याची ख्याती होती. अर्थातच अभ्यास सोडून त्याने इतर कुठल्या गोष्टीमध्ये रमण्याचा प्रयत्नही केला नाही. अमितला कसल्याही प्रकारचे व्यसन नव्हते. त्याचा मित्रपरिवारही खूप कमी होता आणि त्याला कारणही होते. अमितचे जीवन जगणे हे स्वतःपुरता मर्यादित होते. चार भिंतीच्या पलीकडेही एक जग असते ह्याची कदाचित त्याला जाणीवही नसावी. आपली नोकरी आणि आपले घर हेच त्याचे विश्व बनून गेले होते.

माझं विश्व मात्र खूप निराळ होतं, प्रेमाविषयी माझ्या कल्पनाही खूप भिन्न होत्या. रात्री बेडरूममध्ये केल्या जाणाऱ्या प्रणयापेक्षा एक वेगळं असं प्रेमाचं जग असतं, ते मला अनुभवायचं होतं. लोकांची पर्वा न करता मुक्तपणे फिरणाऱ्या जोडप्यांना पाहून आपल्या नवऱ्यानेही इतरांसारखे धाडस दाखवावे असे मला नेहमी वाटायचे. त्यानेही कधीतरी माझा हात पकडून समुद्रकिनारी फिरायला न्यावे. थियेटरमध्ये मुव्ही बघताना माझ्याशी प्रेमाचे चाळे कारावेत. हॉटेलमध्ये जेवताना माझ्या तोंडात त्याने घास भरवावेत. आपल्या बेसुऱ्या आवाजात माझ्यासाठी रोमँटिक गीत गावे, ऑफिसला जाताना गालावर प्रेमाने ओठ टेकवावेत आणि घरी आल्यावर हळूच माझ्या कानात सांगावे मी तुला खूप मिस केलं.......

एका स्त्रीला आनंदी राहण्यासाठी अजून काय हवं असतं?

पण हा आनंद कधी माझ्या नशिबात आलाच नाही. अमितचा गलेलठ्ठ पगार मला हा आनंद विकत घेऊन देऊ शकत नव्हता. ह्या गोष्टीवरून माझी अमितशी खूप चर्चा होई. माझ्या आनंदासाठी कधी कधी तो मला बाहेर घेऊन जाई पण त्यात तो स्वच्छंदीपणा नसे. मला ह्या गोष्टीचा कितीही त्रास झाला तरी त्यासाठी मी अमितला कधीही दोष दिला नाही. कारण त्याची विचारसरणी बदलली तरी त्याचा स्वभाव मी बदलू शकत नव्हते. तो माझ्यासाठी स्वतःला बदलण्याचा प्रयत्न करतोय ह्यातच मी आनंद मानला होता.

त्यादिवशी अमित ऑफिसमधून घरी आला तो एकदम आनंदातच. त्याला इतका आनंदी मी पहिल्यांदा पाहत होते. कपडे बदलून त्याने स्वतःला सोफ्यात झोकून दिले व 'ये कहा आ गये हम' ह्या गाण्यावर त्याने ताल धरला. त्याच्यामधील हा बदल मी थक्क होऊन पाहतच राहिले.

"आज ऑफिसला काही विशेष असं घडलं का, खुप आनंदी दिसताय आज?" मी प्रश्न केला.

"तू ऐकशील, तर तू पण खुश होशील. मी प्रोजेक्ट मॅनेजर बनलोय."

"कॉंग्रॅच्युलेशन्स. आय एम सो प्राउड ऑफ यु अमित."

"आणि त्याहूनही आनंदाची गोष्ट म्हणजे आपण मुंबईला राहायला जातोय. माझी मुंबईला ट्रान्स्फर झालीय"

आम्ही मुंबईला जातोय ही गोष्ट माझ्यासाठी खरंच आनंदाची होती. अमित प्रोजेक्ट मॅनेजर बनलाय त्यापेक्षाही आनंदाची.

"पण माझा इथला जॉब?" मी माझी निरर्थक शंका त्याच्यासमोर मांडली.

"मुंबईला काय शाळा कमी आहेत, कुठेही सहज मिळेल तुला जॉब"

"ते खरं आहे पण मुंबईला राहण्याची सोय नको का करायला?" मी माझी दुसरी शंका त्याच्यासमोर मांडली.

"टू रूमचा फ्लॅट दिला आहे कंपनीने, ऑफिसपासून फक्त दोन मिनिटं अंतरावर"

"सो एक्साईटिंग पण एवढ्या मोठ्या घरात आपण दोघेच राहणार?"

"तू सांगत असशील तर आई बाबांनाही सोबत नेऊया, पण मला नाही वाटत पुणे सोडून ते मुंबईला येतील" अमित अगदी भोळसटपणाने उत्तरला.

"इतका कसा भोळा रे तू? मी आपल्या मुलांविषयी विचारतेय."

मुलाबद्दलचं माझं स्वप्न पुन्हा एकदा जागं झालं होतं. 'जोपर्यंत आपण स्वतःच घर घेत नाहीत तोपर्यंत मुलांबद्दल विचार करायचा नाही' असा निर्णय अमितने आधीच घेतल्यामुळे मीसुद्धा ते स्वप्न पाहणे काही काळापुरता सोडून दिले होते. परंतु आता तो प्रश्न मिटला होता.

"आपण मुंबईला गेल्यावर नक्कीच ह्यावर विचार करू"

"फक्त विचारच की कृती पण?"

माझा प्रश्न निरुत्तरित राहून गेला. त्या नंतरच्या आठवड्यातच आम्ही पुणे सोडून मुंबईला निघून आलो. हजारो लोकांप्रमाणे मीही जेव्हा मुंबईला आले तेव्हा माझ्या सामानाबरोबर काही स्वप्नं जोडीला घेऊन आले. त्याच्यातलं सर्वात मोठं स्वप्नं होतं आई बनण्याचं. मुंबईला मायानगरी असं म्हटलं जातं, त्यात काही वाद नाही कारण दोन महिन्यातच मी ह्या शहराच्या प्रेमात पडले.

ह्या शहराच्या प्रेमात पडण्यामागील कारण काय असावे?

मला मिळालेला नवीन जॉब?

माझा सुंदर असा टू रूमचा फ्लॅट की मला मिळालेला मोकळेपणा?

असं काय दिलं होतं मला ह्या शहराने?

खरं म्हणजे उत्तर खूप दिवसापासून माझ्या समोर होतं पण मी समजू शकले नाही.

मुंबईला आल्यानंतर पहिल्याच रात्री मला कोण तरी भेटलं होतं. एक मुलगा... एक शेजारी... एक मित्र. जो कोण असेल तो. पण त्याच्या असण्याने खूप काही गोष्टी बदलल्या होत्या.

जीवनामध्ये कसलीही महत्त्वकांक्षा नसलेला तरीही जीवनातील प्रत्येक क्षणाचा आनंद लुटणारा हा मुलगा, त्या पहिल्याच भेटीत हृदयाला स्पर्श करून गेला होता.

आम्ही मुंबईला आलो त्या रात्री आम्ही बाहेरच जेवणे पसंद केले. जेऊन घरी आलो त्यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते. आम्ही दहाव्या मजल्यावर राहत असल्यामुळे त्याठिकाणी पोहचण्यासाठी लिफ्टशिवाय दुसरा पर्याय नव्हता. आम्ही लिफ्टच्या दिशेने वळालो तोच लिफ्टचे दार बंद होत असलेले आम्हाला दिसले व नकळतच माझ्या तोंडातून 'लिफ्ट' असे शब्द बाहेर पडले.

'खूल जा सीम सीम' बोलताच गुहेचे दार उघडावे तसे लिफ्टचे दार उघडले गेले. लिफ्टमध्ये माझे पाउल पडले त्यावेळी मला एक गोष्टीची कल्पना नव्हती की ते पाउल, मोहरुपी जगातील माझे पहिले पाउल होते. आत एक तरुण उभा होता, उंच व देखणा. गुडघ्यावर फाटलेली जीन्स, ब्लॅक टीशर्ट, खांद्याला सॅक, एका हातात हेल्मेट असे त्याचे सर्वसाधारण रूप असले तरी दिसायला तो एखाद्या मॉडेलपेक्षा कमी नव्हता. मी त्याच्याकडे तिरप्या नजरेने पाहिले आणि त्याने आमच्याकडे प्रश्नार्थक नजरेने.

"आर यु गोइंग ऑन टेन्थ फ्लोअर?" त्याने प्रश्न केला.

लिफ्ट चालू होऊनही आम्ही बटण न दाबल्यामुळे त्याने तो प्रश्न केला असावा. योगायोगाने तो सुद्धा दहाव्या मजल्यावर जात असल्यामुळे आम्हाला त्या नंबरचे बटण दाबण्याची गरज पडली नव्हती.

"येस" अमितने मान डोलावली.

"म्हणजे तुम्हीच आहात मि. कदम?" त्याने प्रश्न केला

"तुला कसं माहित?" अमितने प्रतिप्रश्न केला.

"एकुलते एक शेजारी आहात माझे. तेवढी माहिती ठेवावी लागते."

एवढं बोलून तो तरुण सुंदर हसला व त्याने खिशात हात घालून चाव्यांचा बंच बाहेर काढला. मी अजूनही त्याच्याकडे तिरप्या नजरेने पाहत होते. का? ते मला आजही सांगता येणार नाही. लिफ्ट थांबताच आमच्या मागोमाग बाहेर पडताना त्याने अमितला हाक मारली

"मि. कदम"

अमितने मागे पाहिलं. मीसुद्धा ही संधी वाया घालवणार नव्हती.

"माझं नाव रोहित, तुमच्या समोरच्या रूममध्ये राहतो. काही काम असेल तर तुम्ही मला कधीही त्रास देऊ शकता."

सर्व काही एक क्षणात घडून गेलं. रोहितने दार बंद करताना माझ्याकडे तिरप्या नजरेने पाहिलं. ती एक नजर पुरेशी होती माझं आयुष्य उध्वस्थ करायला. पुढे सर्व काही नाट्यमय रीत्या घडत गेलं जणूकाही कुठल्यातरी पुस्तकात मांडलेला एक अध्यायच असावा.

दुसऱ्या दिवशी अमित ऑफिसला गेल्यानंतर मी बाजारातून सामान घेऊन घरी आले. सामान फ्रीजमध्ये ठेवत असतानाच दारावरची बेल वाजल्याचा आवाज आला. मी सामान तसेच टाकून दार उघडले बघते तर दारात रोहित उभा होता, शॉर्ट आणि बनियानवर. त्याचे दोन्ही हात पॅण्टच्या खिशात होते व त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्न असे हास्य होते.

“गुड मॉर्निंग” त्याचे ओठ पुटपुटले.

“हाय, प्लीज कम इन” मी अगदी सहजच त्याला आत येण्याचे आमंत्रण दिले. अमित घरात नाही हे माहित असूनही. तो आत आला व माझ्या परवानगीची वाटही न बघता सोफ्यात बसला.

“कसं वाटलं आमचं मुंबई?” त्याने प्रश्न केला.

“तुमचं मुंबई?” मीच त्याला उलट प्रश्न केला.

“हो, आमचं मुंबई. इथे राहणारा प्रत्येक मराठी माणूस मुंबईला अभिमानाने ‘आमची मुंबई’ असच म्हणतो”

“तुमचं मुंबई मी अजून बघीतलंच नाही?”

“लवकरच बघा, खरंच सुंदर आहे. पण बघण्याचा एक वेगळा अंदाज असायला हवा”

“जसा की?” मी प्रश्न केला.

“जसा की..... जे काही बघाल ते बघताना एक लहान मुल बनून जा सर्व गोष्टी आकर्षक वाटू लागतात.” बोलता बोलता तो मध्येच थांबला व त्याने इथे तिथे पाहत प्रश्न केला

“मि. कदम कुठे आहेत?”

“ते गेले ऑफिसला”

“ओ! देन आय एम एट राँग टाईम” त्याने उठण्यासाठी हालचाल केली.

“त्यात काय झालं. इथे येण्याचा एक वेगळा अंदाज असेल तर त्यात काही राँग नाही.”

“जसा की” त्याने प्रश्न केला.

“जसा की..... इथे येताना एक लहान मुल बनून या” मी त्याच्याकडे हसतच पाहिले.

“नॉट बॅड. मिसेस कदम...”

“प्लीज कॉल मी मयुरी. मिस्टर रोहित”

“ओ. के. मयुरी, मी पटकन माझी खेळण्यातली कार घेऊन येतो आपण त्यात बसून मुंबई बघायला जाऊया” तो माझी चेष्टा करतोय हे माहित हे माहित असूनही मी त्याच्या बोलण्यात सामील झाले अगदी लहान मुलगी बनून.

“पण तू मला आईस्क्रीम घेऊन देशील ना?

“मम्मी सांगते आईस्क्रीम खाल्याने खोकला होतो” लहान मुलासारखी नक्कल करीत तो म्हणाला. मला त्याचे हसू आले आणि माझे स्वतःचेसुद्धा. ‘अजून एकमेकांची नीट ओळखही नसताना हा पोरखेळ काय खेळतोय आपण?’ मी स्वतःच्या मनाला प्रश्न केला. पुढचा प्रश्न मी रोहितला केला.

“आज कामावर नाही जाणार?”

त्यामागील माझा हेतू त्याला तेथून बाहेर पाठवण्याचा नव्हता. मला त्याच्याविषयी खूप काही जाणून घ्यायचे होते. आयुष्यात पहिल्यांदा मी कुठल्या मुलाबरोबर इतके भावूक होऊन बोलत होते. तो आमच्या मैत्रीचा पहिला क्षण होता. त्यानंतर असे क्षण आमच्या जीवनात रोजच येत गेले. आमचं मैत्रीचं नातं खूपच घट्ट बनत गेलं. मला संपूर्ण मुंबई दर्शन रोहितने त्याच्या बाईकवरून घडवलं. अमितला त्याच्या कामातून कधी फुरसतही मिळाली नव्हती. मी घरी एकटी काय करते, कुठे जाते, काय खाते हे साधे प्रश्नही त्याच्या मनात कधी निर्माण झाले नाहीत. घरामध्ये आपल्या सोबत बायको नावाचा एक प्राणी राहतो हेच तो विसरून गेला होता.

दुसऱ्या बाजूला रोहित, कुठल्यातरी मासिकासाठी फोटोग्राफर म्हणून काम करायचा. कामाचं कसलं बंधन नाही, जीवनात खूप काही करण्याची महत्त्वकाक्षा नाही. त्याला त्याच्या जीवनाचं काहीच पडलं नव्हतं. येणारा क्षण आपला आहे तो आपल्यालाच जगायचा आहे. तो कसा आनंदात जगता येईल हीच त्याची धडपड आणि एवढंच त्याचं उद्दिष्ट.

मुंबईत आल्यानंतर जर मला रोहित भेटला नसता तर माझं जीवन इतकं आनंदी बनू शकलं असतं का?

सकाळची कॉफी शेअर करायला जर रोहित नसता तर त्या कॉफीला तिच चव आली असती का?

माझा नवीन फ्लॅट सावरायला जर रोहित नसता तर त्या फ्लॅटला घरपण आलं असतं का?

ज्या मुंबईच्या प्रेमात मी पडले होते ती 'आमची मुंबई' दाखवायला जर रोहित नसता तर हे होऊ शकलं असत का?

आणि ज्या गोष्टी रोहितने माझ्यासाठी केल्या त्याच जर आमितने केल्या असत्या तर त्या रात्री जे घडलं ते घडू शकलं असतं का?

"मी तीन दिवसासाठी पुण्याला जातेय रोहित." सकाळी कॉफी पिताना मी रोहितला सांगितलं.

"का आईची आठवण आली?"

"नाही, अमित ऑफिसच्या कामासाठी दिल्लीला जातोय, विचार केला तोपर्यंत सगळ्यांना भेटून येऊया."

"म्हणजे तू माझ्या बर्थडेला नसणार तर?"

"तुझा बर्थ डे आहे? कधी?" मी आश्चर्याने विचारलं.

"परवा"

मी काही बोलले नाही. पुण्याला जाण्याचा निर्णय मी आधीच घेतला होता. त्या संध्याकाळी मी पुण्याला निघून गेले व अमित दिल्लीला. त्याच्या दुसऱ्या दिवशी रात्री बारा वाजता मी रोहितला बर्थडे विश करण्यासाठी फोन केला पण त्याने तो उचलला नाही. माझा हा प्रयत्न दुसऱ्या दिवशी बारा वाजेपर्यंत चालू होता. अचानक माझ्या मनाने एक वेगळाच निर्णय घेतला. मी माझी बॅग भरून माझ्या मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी पुन्हा मुंबईच्या दिशेने रवाना झाले.

संध्याकाळची साधारण आठची वेळ होती. मी फ्रेश होऊन बाहेर आले व रोहितच्या दारावरची बेल वाजवली. रोहितने दार उघडले, मला वाटलं मला पाहून त्याला आश्चर्य वाटेल पण तसे काही घडले नाही. त्याने दार उघडेच ठेवले व तो आत निघून गेला.

"तू फोन का नाही उचलला?"

"उचलला असता तर तू माझ्यासाठी इथे निघून आली नसतीस"

"आणि जर मी आली नसती तर?"

"तू मला बर्थ डे विश करू शकतेस" रोहितने फ्रीज उघडले व बिअरचा कॅन बाहेर काढला व तो ओपन करून तोंडाला लावला.

"हॅपी बर्थडे" मी त्याचा हात हलवत म्हटले. त्याने लगेच मला बिअर ऑफर केली.

"मी बिअर नाही पीत"

"तू कधी कुणाचा हातही पकडून ठेवत नाहीस" रोहित हसत म्हणाला. मी त्याचा हात तसाच पकडून ठेवला होता. मी तो सोडण्याचा प्रयत्न केला पण रोहितने तो सोडला नाही. मीही त्याला विरोध केला नाही.

"तू माझ्या प्रश्नाचे उत्तर नाही दिले. जर मी आली नसती तर?"

"आता आलीच आहे तर मागे सरकू नकोस" इतके बोलून त्याने मला जवळ ओढले. त्यांनतर जे घडले, ते स्वप्न नक्कीच नव्हते. मी अक्षरशः ओढले गेले त्या मोहरुपी जाळ्यात. माझ्या आयुष्यातील ती सर्वात दीर्घ रात्र होती. आजही त्या रात्रीच्या आठवणींनी माझे सर्वांग शहारून उठते. मी पाप केले होते ते मला कळत होते पण त्याठायी मला मिळालेले सुख मी नाकारू शकत नव्हते. त्या रात्रीत मी अमितचा विश्वासघात केला होता ते मला कळत होते पण रोहितच्या गरम श्वासाचा स्पर्श मी नाकारू शकत नव्हते. त्या रात्री दहाव्या मजल्यावरील खिडकीतून दिसणाऱ्या मुंबईचे सौंदर्य माझ्या चेहऱ्यावर उमटले होते आणि माझ्या कानात कसलेतरी सूर घुमत होते 'जरा हटके, जरा बचके, ये है मुंबई मेरी जान'

त्या रात्री जे घडले ते पुन्हा कधी घडले नाही. किंबहुना मी ते घडू दिले नाही. त्यानंतर प्रत्येक सेकंदाला माझे मन मला खाऊ लागले होते. माझ्या आणि रोहितच्या मैत्रीमध्येही आता ती निखळता राहिली नव्हती. अमित समोर तर मी एक अपराध्या सारखी वावरत होते. त्याच्याही नजरेतून ही गोष्ट सुटली नव्हती. ह्या सर्व गोष्टीचा सोक्ष मोक्ष लावणे गरजेचे होते आणि त्याचा पूर्ण विचार करून मी एक दिवस माझ्या हातून घडलेल्या पापाची कबुली अमितला दिली.

त्या रात्री माझ्या हातून घडलेलं पाप ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती की त्या पापाची कबुली देणं ही? ह्या गोष्टीचा निर्णय आता तुम्हालाच घ्यायचा आहे. ज्यादिवशी मी अमितला सर्व काही सांगितले त्याच्या बरोबर दुसऱ्या दिवशी रोहितचा मृतदेह त्याच्या रुममध्ये सापडला अमित सात वर्षासाठी जेलमध्ये निघून गेला. मी आजही त्या दहाव्या मजल्यावर राहते. रोहित आणि अमित ह्या दोघांच्या आठवणींशी खेळ खेळत. मला कालच समजले मी आई होणार आहे पण मला अजूनही माहित नाही माझ्या पोटात रोहीतचं पाप वाढतेय की आमितचं पुण्य.

# स्वप्नाळू

लुकलुकणाऱ्या अगणित ताऱ्यांनी पांघरलेली अशी ती रात्र. एक युवक दिवसभर मेंढरे चारून थकून-भागून ती रात्र घालवण्यासाठी एका पडीक, छप्पर नसलेल्या घरसदृश अशा ठिकाणी येतो. तेथे असलेल्या भग्नावस्थेतील साक्रमेंतावरून ते चर्च असल्याचे त्याला जाणवते ! तेथे एका मोकळया जागेत पाठ टेकून व चांदण्याकडे नजर लावून तो झोपी जातो ते एक सुंदर स्वप्नं पाहण्यासाठीच..

पहाटे पापणी उघडण्यापूर्वी मनाच्या अनंत अवकाशात लूप्त होणारं नेहमीच्या स्वप्नासारखं मात्र ते स्वप्नं नसतं. सकाळी लखलखीत उजेडात तेवढ्याच लखलखीतपणे त्याला ते स्वप्नं आठवत असतं. त्या स्वप्नात त्याने डोळे दिपवणारा खजिना बघितलेला असतो. रसरशीत, मनस्वीपणाने जगणारा तो मुलगा मग त्या स्वप्नातील खजिन्याच्या शोधात बाहेर पडण्याचा निश्चय करतो. कित्येक महीने तो त्या खजिन्याच्या शोधात घालवतो. त्या प्रवासात त्याला बऱ्याच संकटांचा सामना करावा लागतो. पण तो त्यावर धीटपणे मात करीत पुढील वाटचाल करीत राहतो. खजिन्याच्या निश्चित स्थळी पोहोचेपर्यंत त्याच्या पुढ्यात आयुष्य समृद्ध करणारे अनेक अनुभव येतात. पण निश्चित स्थळी आल्यावर मात्र तो निराश होतो, कारण एवढे महीने त्याने ज्या खजिन्याच्या शोधात घालविलेले असतात तो खजिना त्याने जेथे त्याचे स्वप्नं पाहिले अशा भग्नावस्थेतील चर्चमध्येच असतो. त्याने जेथून सुरुवात केली होती तिथेच त्याला नियतीने कित्येक महीने फिरवून परत आणले होते. त्याला वाईट वाटते व तो विचारमग्न होतो. पण त्याची ती निराशा फक्त थोड्या वेळापूरताच टिकते. लगेचच त्याच्या चेहेऱ्यावर एक वेगळेच समाधानी हास्य उलटते कारण त्याला आता एक वैश्विक सत्य उलगडलेले असते.....

पॉल कोयलो ह्या ब्रज़िलिअन लेखकाचं 'द अल्कीमिस्ट' हे काही वर्षापूर्वी वाचनात आलेले एक नितांतसुंदर इंग्रजी पुस्तक. काहीशी रूपक वळणाने जाणारी अशी ही कथा यात आहे. रूपक कथा प्रकारात लेखक त्याचे स्वतःचे विचार मांडताना वेगवेगळी रूपके वापरून वाचकांना फक्त कथेचा अनुभव देतो. बोध वाचकाने स्वतःच्यापरीने स्वतःच घ्यायचा असतो. त्यामुळे एक आगळाच आनंद वाचकाला मिळत असतो. कथेचा शेवट वाचून तर एक सुंदर कविताच वाचल्याची अनुभूती येते.

युवक असल्याने मला त्या मुलाचा अभिमानयुक्त हेवा वाटला. सर्वांची लहानपणी काही ना काही स्वप्ने असतात. पण त्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी प्रवाहाविरुद्ध पोहोण्याची हिंम्मत दाखवणारे फार थोडे असतात. शिक्षण, करीयर, पैसा ह्या मानवनिर्मित जाळ्यात आपण असे काही अडकून जातो कि तीच स्वप्ने मग आपल्याला वाकुल्या दाखवत राहतात.

'तू तर चांगला शिकलेला वाटतोस, मग तू धनगर का झालास? ' ह्या प्रश्नावर त्या मुलाचे  'कारण मला वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला आणि नवीन लोकांना भेटायला आवडते आणि धनगर असल्याने ते सहज शक्य होते' हे उत्तर आपल्याला स्तिमित करते. व वैयक्तिक आवड आणि करियर ह्यांची सांगड घालणाऱ्या त्या मुलाच्या धीटपणास सलाम करावयास लावते.

आज माहिती तंत्रज्ञान व दूरसंचार ह्या क्षेत्रातील देदीप्यमान प्रगतीमुळे अवघं जग हे अक्षरशः एक "online community' झाले आहे. आज आयटी ने परंपरा, नाती, व्यवहार ह्या एकंदरीत सोशलायझिंगच्या संज्ञाच बदलून टाकल्या आहेत. 'मित्रांना भेटणे' याचा अर्थ तासभर ठरलेल्या कट्ट्याच्या ठिकाणी एकत्र येवून भेटणे केवळ एवढाच न राहता, ऑफिसमध्ये बसल्याबसल्या एक मिनट 'Wassap किंवा facebook chatting' करणे एवढा सहजसोप्पा बनला आहे. पाकिटातील रोख रकमेची जागा कधीच एका 'portable' डेबीट कार्डने बळकावली आहे. अशा ह्या सर्व फास्टफॉरवर्ड बदलात माणसाचे 'माणूसपण' अधोरेखित करणारी एकच गोष्ट बदलली नाही वा पुढे बदलणार नाही ती म्हणजे 'स्वप्नं बघणे'

'स्वप्नं पूर्ण झाली नाही तर ?' ह्या भीतीने बहुतांश लोकं स्वप्नं बघणं तरी टाळतात किंवा किंवा  बघितली तरी त्यांचा पाठलाग करणं थांबवतात. पण स्वप्ने बघण्यात व त्याला मेहनतीची जोड देऊन ती पूर्ण करण्यात दुहेरी फायदा असतो. जर स्वप्नं पूर्ण झाली तर आतापर्यंत उपसलेल्या कष्टांवर नियतीने उमटवलेली ती मोहोर असते. आणि स्वप्नं जर नाही पूर्ण झाली तरी ते तडीस नेण्याच्या उद्देशाने केलेला  प्रवास माणसाला एका वेगळ्याच उंचीवर पोहोचवतो. 'खरा आनंद हा ध्येय गाठ्ण्यामध्ये नसून, ध्येयपूर्तीपर्यंतच्या केलेल्या प्रवासात असतो' हे वैश्विक सत्य आपल्याला हे पुस्तक अप्रत्यक्षरित्या उलगडून दाखविते. भौतिक सुखाच्या मागे लागताना आपण आपल्या स्वप्नांचा बळी तर देत नाही ना ह्याविषयी प्रत्येक युवकाने आत्मपरीक्षण करावे.

**- डॅनिअल मस्करणीस, वाघोली**

# संवाद

नुकताच देशात आर्थिक जनगणना झाली.मी एका अनुदानित शाळेत कामाला असल्यामुळे मलादेखील प्रगणकाची नेमणूक मिळाली होती.

काहीशा नाराजीनेच मी माझ्या नेमून दिलेल्या विभागात कामाला सुरवात केली.मी घरोघरी फिरत होतो,विहित नमुन्यात आवश्यक माहिती गोळा करत होतो.लोकही चांगला प्रतिसाद देत होते.परंतु ज्यावेळी माहितीच्या पलीकडे जाऊन मी संवाद साधू लागलो तेव्हा मन ढवळून निघालं.

बहुतांश घरात फ़क़्त जेष्ठ नागरिकच आढळत.घरातली तरुण मंडळी कामानिमित्त बाहेर. छोटी कंपनी शाळा, कॉलेज,ट्यूशनमध्ये.घरात उरतात ते केवळ वार्धक्याकडे झुकलेले जेष्ठ.त्यामुळे त्यांच्याशीच जास्त संपर्क यायचा.मग हि मंडळी आवश्यक माहिती तर द्यायचेच परंतु त्यापलीकडे जाऊन संवाद सुरु व्हायचा.

एक वयस्क स्त्री,वय वर्ष ७५ .आपल्या घराविषयी,मुलांविषयी,आजारी पतीविषयी भरभरून बोलत असते.सुमारे अर्धा तास गप्पा होतात.शेवटी मीच निरोप घेतो.

६५ वर्षे वयाची एक व्यक्ती आपल्या कवितांविषयी भरभरून बोलते ,बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीविषयी चर्चा करते.लेखन करण्याविषयी मार्गदर्शन करतात.गप्पा सुमारे तासभर रंगतात.

सुमारे सत्तर वर्षे वयाचे एक सद्गृहस्थ.डबल पोस्ट ग्रॅजुएट.एका शाळेतून मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झालेले.परंतु स्वतःचा मुलगा s.s.c. देखील झाला नाही ह्याची खंत.काहीच काम करत नाही,केवळ घरी झोपून असतो हि वेदना.

अशा अनेक व्यक्ती मला भेटल्या.मी थोडावेळ का होईना त्यांच ऐकलं परंतु माझ्या मनात विचारांचं नवं चक्र सुरु झालं.

का हि मानसं एवढं भरभरून बोलत होती?
आणि माझ्या प्रश्नाचं उत्तरदेखील मला मिळालं.ते होतं आज हरवत चाललेला संवाद.
आज माणसामाणसात संवाद लोप पावत चालला आहे.मुळात प्रत्येक घरात माणसचं कमी आहेत.जी आहेत ती संवादाऐवजी वादात अडकलेली.विरुद्ध दिशेला तोंड करून बसलेली.उरलेली टीव्ही व तत्सम मनोरंजनात्मक साधनांत गुंतलेली.त्यामुळे एकमेकांशी बोलायला,कुणाचं ऐकायला,कोणालाच वेळ नाही.म्हणून तर माणसांच्या मनातील भावना मनातच कोंडल्या जातात आणि मग असं एकाकी जीवन जगण्यावाचून पर्याय उरत नाही.
अशा शुष्क ,कोरड्या जगण्याचा परिणाम माणसांच्या शाररिक व मानसिक स्वास्थ्यावर होतो.आयुष्यभर जमा केलेलं औषधपाण्यावर खर्च होतं.
एकांतपणा हा जीवनात येणारच आहे.तो बदलत्या जीवनशैलीचा भाग आहे.आपण त्यापासून दूर पळून जाऊ शकत नाही.
म्हणून पुलंनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही करत असलेला कामधंदा तुमच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवील पण एखादी कला,छंद निश्चित जोपासा जी तुम्हाला जीवन कसं जगावं हे शिकविल.

काळाचं जातं सगळ्यांनाच भरडते,
कोणी हसते, कोणी रडते,
तरीसुद्धा,प्रत्येकजण अपुल्या सुरात जीवनगाणे गाते.
सोनेरी किरणांनी रवी उगवतो,
भर दुपारी मध्यान्ही तळपतो,
तरी तिन्ही सांजेस अस्तास जातो,
नित्यनियमाने तो हे कालचक्र फिरवतो.
नाजूक कलिका फांदीवर प्रकटते,
हळूच फुलून मग गंध पसरते,
कोमेजण्याची तिज तमा नसते,
कारण,नवनिर्मितीचे बीज तिच्यात असते.
टपटप संतत धारा बरसतात,
अवनीस भिजवूनी प्रवाहास मिसळतात,
अल्लड नदी ओसंडून वाहते,
सागरास मिळून तीही सुखावते.
कुणी न शास्वत आणि अमर,
मग का असावा ‘जाण्याचा’ डर,

आला क्षण मस्त जगावा,
जगण्याचा आनंद हृदयी भरावा.

एमेल आल्मेडा

# एक घास

तिने मुलाकरिता उचललेला घास अर्ध्यावर थांबला होता. तो निष्पाप जीव आश्चर्यचकित होऊन तिच्या चेहऱ्याकडे पाहत होता. तिने उच्चारलेल्या त्या शेवटच्या शब्दाचा अर्थ त्याला कळला नव्हता, नव्हे तो शब्दच त्याने पहिल्यांदा ऐकला होता. त्याला घास भरविताना ती त्याला सांगत असलेल्या गप्पागोष्टींच्या ओघात तिच्या तोंडून नकळत "तो" शब्द बाहेर पडला होता. त्याचक्षणी तिचा हात आखडला गेला नि तिच्या डोळयांच्या कडेला पाणी जमू लागलेलं.. आता तिचं मन इतिहासाची पाने चाळू लागलं.

पाच वर्षापूर्वी लग्न झालेल्या मालतीच्या संसारवेलीवर तीन वर्षानंतर दीपक फुलला होता. त्याच संगोपन करण्यात चंद्र कधी उगवत होता हेही तिला कळत नव्हतं. दीपकचे लाड करणे, त्याचे लाडिक हट्ट पुरविणे, त्याला भरवणं जोडीला घरातली इतर कामे, मालतीला सेकंदाचीही उसंत नव्हती. दीपकच्या आगमनानंतर ती तीन वर्षाआधीची ती विध्वंसकारी घटना विसरून गेली होती. लग्नानंतर तीन वर्षे तपश्चर्या करून मातृत्वाची चाहूल लागलेल्या तिला नि प्रकाशला किती किती आनंद झाला होता... किंबहुना प्रकाशलाच तिच्याहून जास्त आनंद झाला होता. मालतीला काही त्रास होऊ नये याची तो स्वतः काळजी घ्यायचा.

मालतीची प्रत्येक मागणी, हट्ट प्रकाश पुरी करीत असे. पण एकदिवशी डॉक्टरांचे शब्द ऐकून प्रकाशच्या चेहऱ्यावरील आनंदाला ओहोटी लागली. मालतीच्या हे लक्षात आलं होतं. दवाखाना ते घरापर्यंतच्या प्रवासात प्रकाश हा.! हुं.! व्यतिरिक्त काहीच बोलला नाही.

घरी आल्यावर त्याने आईच्या कानावर बातमी घातली आणि त्याचक्षणी घरातलं वातावरण गढूळ झालं. आईने आपल्या परीने मालतीचा समाचार घायला सुरवात केली होतीच. दोन दिवसांनी प्रकाशच्या आईने मालतीला गर्भपात कर असे सांगताच कानठिळ्या बसविणारा अणुस्फोट व्हावा तसा "गर्भपात" हा शब्द मालतीच्या कानात घुमला. वसंताची वाट पाहत बसलेल्या वेलीवर कोंब फुटलाच होता कि तो खुडून टाकायच्या गोष्टी सुरु झाल्या होत्या... मालतीला त्यासाठी तयार केलं जात होतं... प्रकाश, ज्याने कुठल्याही परिस्थितीत तुझ्या पाठी उभा राहीन असे वाचन दिले होते, त्याने अचानक आपला पाठींबा काढून तो विरोधी पक्षात सामील झाला होता. मालतीच्या मनात भावनांच्या ढगांची दाटी झाली होती. कित्येकवेळा ते बरसले देखील पण कितीही पाणी वाहून गेले तरी दगड कोरडाच. असेच काहीसे प्रकाश नि त्याच्या आईबद्दल झाले होते.

मालती काही केल्या ऐकत नव्हती. प्रकाशने खूपशे प्रयत्न करून पहिले पण मालती काही केल्या ऐकत नाही हे पाहून त्याने "घटस्फोट" हे अस्त्र मालतीवर फेकलं आणि त्याने प्रकाशला अपेक्षित असलेलं घडून आलं. "घटस्फोट" शब्द ऐकून मालती पार हादरून गेली. कोलमडून गेली. नाईलाजास्तव तिला गर्भपात करावा लागला.

मालतीने मनाविरुद्ध गर्भपात करून घेतला खरा पण तो घाव तिच्या खूप वर्मी लागला होता. तिला त्या धक्क्यातून बाहेर येण्यासाठी दोन वर्षे लागली. या काळात प्रकाशने तिची खूप काळजी घेतली. पण मालती त्याला त्याने घेतलेल्या त्या निर्णयामुळे माफ करू शकली नाही. कोणाशी बोलणे नाही. कुणाला भेटणे नाही, कुठे बाहेर जाने नाही. मालतीने स्वतःला घरात कैद करून घेतले. तिची ती अवस्था पाहून प्रकाशच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण झाली होती. विचारपूर्वक कोणताही निर्णय घेणारा प्रकाश आईच्या मांत्रिक बोलण्याला बळी पडला होता. नेहमी हसऱ्या मालतीच्या चेहऱ्यावरील दुःखाने घरात माणसे असूनही नसल्यासारखीच होती.

पण हळूहळू हे चित्र बदललं ते दीपकच्या येण्याने. मालती पुन्हा हसू लागली. गाऊ लागली. घरात त्यामुळे चैतन्य पसरलं. दीपकच सारं करता करता ती पुरती थकून जाई. पण त्यात तिची काही तक्रार नसे उलट त्यात तिला आनंदच होत असे. दीपकला आंघोळ घालताना, त्याला घास भरविताना गोष्ट सांगणे, झोपविताना गाणी गाणे हे नित्याचे झाले होते.

आज दीपक भालाच मस्तीत आला होता. गोष्टी ऐकूनही काही केल्या जेवत नव्हता. एक, मग आणखी एक अशा तीन-चार गोष्टी सांगून झाल्या होत्या पण काही उपाय झाला नव्हता. असे म्हणता म्हणता ती सहज म्हणाली -

एक घास चिऊचा…

एक घास काऊचा…

एक घास आजीचा…

एक घास पप्पाचा…

एक घास आईचा…

एक घास ताssssई.....

मालती पुढे बोलूच शकली नाही. तिचे डबडबले डोळेच बोलत होते. पण बिचाऱ्या दीपकला काही समजलं नाही. काही नवीन ऐकल्यासारखं तो तिच्या चेहेऱ्याकडे एकटक पाहत होता...

----एडवर्ड डिसोझा

# कवी आणि कविता

*वाचकाची भाषीक क्षमता आणि कल्पकता हा कवितेचा एक आवश्यक घटक आहे. कवितांच्या संहिता स्वयंमेव कवितेची घटना बनू शकत नाहीत. कवी आणि वाचक या दोन मानवी घटकांमध्ये संहितेच्या माध्यमातून अदलाबदल होऊ शकते.* दिलीप चित्रे (साहित्य आणि अस्तित्वभान पा. **320**)

कवी कविता करतो म्हणजे काय करतो□वाचक कविता वाचत असतो तेव्हा नेमकं काय करत असतो□या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर कवी वाचक परस्परसंबंध काय हे लक्षात येऊ शकते. कवितेला केंद्रस्थानी ठेवून कवितेत कवीचं स्थान काय आणि वाचकाचं स्थान काय हेदेखील तपासता येईल. कविता ही स्वतःहून कविता असते का□की कवितेचा वाचक कवितेला कविता म्हणून घडवतो□असाही शोध घेता येईल.

**1.**

कवी कविता करतो त्याआधी त्याच्याकडे कविता करण्यासाठी काय सामग्री असते हे बघणे आवश्यक आहे. कवी वाचक संबंध जाणून घेण्यासाठी ते आवश्यक आहे. कवीकडे भवताल असतो. अवकाश असते. कवीकडे अथांग भुतकाळ असतो. कवीच्या भवतालात असंख्य घटना घडत असतात. कवीच्या अंतरंगात जे भुतकाळाचं गाठोडं असतं त्यामध्ये या असंख्य घटना कायमसाठी सेव केल्या जातात. कवीचं मन कवीच्या भुतकाळाने घडवलेलं असतं ज्याला आपण कंडिशनींग (संस्कारबद्धता) म्हणतो. कवी त्याच्या कंडिशनींगप्रमाणे त्याच्या भवताली घडणारया घडामोडींचं इंटरप्रीटेशन्स करतो. विश्लेषन करतो. ही इंटरप्रीटेशन्स, विश्लेषणं त्याच्या मनात पुन्हा साठवली जातात. थोडक्यात अनुभव घेणं आणि तो मनात साठवला जाण्याची किया अखंड अविरतपणे कवीच्या मनात चालूच असते.

कवीकडे आणखी एक कांतीकारी गोष्ट असते ती म्हणजे भाषा. कवीची भाषा ही पुन्हा त्याच्या भवतालाने घडवलेली एक अत्यंत खाजगी आणि तितकीच सार्वजनीक बाब असते. या भाषेत जगभरातील असंख्य संदर्भ साठवले जाण्याची कीया अविरतपणे चालूच असते. यातुनच कवीची भाषा विकास आणि विस्तार पावत जाते. कवी जी अनुभूती घेतो तिला व्यक्त करण्यासाठी कवीकडे भाषा हीच अगदी सहज नैसर्गीकरीत्या उपलब्ध असते. कवी त्याच्या मनातील अमुर्त अनुभवांना भाषेच्या माध्यमातून मुर्त रूप देण्याचा प्रयत्न करतो. त्याला आपण कवीची भाषीक कृती म्हणतो. ही भाषीक कृती कवी लिपीबद्ध करतो. (भाषा लिपीरूपाने नोंदवून ठेवण्याच्या क्षमतेचा विकास हा मानवी विकासकमातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.)

कवीकडे असणारी आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कल्पकता. कवी भाषीक कृती निर्माण करताना आणि तिला लिपीरूपाने नोंदवून ठेवताना कल्पकता वापरतो. किंबहूना कवीची कल्पकता नेहमी जागृत असते. कवीकडे स्वतःची एक सौंदर्यदृष्टीदेखील असते. ही सौदर्यदृष्टी त्याच्या कंडीशनींगचा एक भाग असते. कवी जेव्हा भाषीक कृती घडवतो तेव्हा त्याच्या सौंदर्यदृष्टीला अनुलक्षून श्ब्दांची, प्रतिमांची निवड करतो आणि त्यांची मांडणी किंवा रचना करतो. याशिवाय ज्या विशीष्ट काळात आणि विशीष्ट मानसीक, भावनीक, आध्यात्मिक, सामाजीक, राजकीय परिस्थितीमध्ये कवी भाषीक कृती घडवतो त्या काळाने आणि परिस्थितीने ती भाषीक कृती प्रभावीत होत असते.

ज्या भाषीक अवकाशात कवी राहत असतो त्यामध्ये काव्यपरंपरा असते. ही काव्यपरंपरा सरळ दाखवता येईल अशी एकरेषीय नसते तर गुंतागुंतीची असते. झाडाच्या फांदयांप्रमाणे ती पसरलेली असते. कवी त्या काव्यपरंपरेमध्ये स्वतःची परंपरा शोधतो किंवा तिला आपलसं करतो. कवीने स्वतःहून निवडलेल्या किंवा आपलसं केलेल्या काव्यपरंपरेचे बरे वाईट संस्कार कवीची सर्जक क्षमता घडवतात. त्यानुसार कवी भाषीक कृती निर्माण करत असतो. एखादा कवी आपली परंपरा पचवून तिच्या पुढे जातो किंवा परंपरेला आणखी विस्तारीत करतो. एखादा कवी त्या परंपरेच्या जोखडात अडकून पडतो. काहिही असलं तरी परंपरा नसलेला कवी नसतो. थोडक्यात कवीकडे परंपरा असते.

ही सर्व सामग्री पदरी बाळगून कवी कविता लिहीण्याचं महत्कार्य करतो.

**2.**

वर सांगीतलेली कवीकडे असणारी एकूण एक सामग्री वाचकाकडे देखील असते. वाचकाकडे भवताल असतो. अवकाश असते. भुतकाळ असतो. वाचकदेखील विशीष्ट परिस्थीतीने, अनुभवांनी कंडिशन्ड (संस्कारबद्ध) झालेला असतो. वाचक त्याच्या कंडिशनींगप्रमाणे इंटरप्रीटेशन्स, विश्लेषन करीत असतो. अनुभव घेण्याची आणि साठवले जाण्याची किया वाचकाच्याही मनात कळत नकळतपणे अव्याहत सुरू असते. कवीकडे असणारी कांतीकारी गोष्ट म्हणजे भाषा ही वाचकाकडेदेखील असते. वाचक विचार करतो तो भाषेच्या सहाय्याने, चिंतन करतो तेसुद्धा भाषेच्या सहाय्यानेच. वाचकाकडे कल्पकता असते. प्रत्येक माणसाकडेच कल्पकता असते. वाचकाच्या कंडिशनींगप्रमाणे त्याचीही एक सौंदर्यदृष्टी विकसीत झालेली असते. कोणत्याही भाषीक कृतीकडे वाचक त्याच्या सौदर्यदृष्टीने पहात असतो. त्याच्या सौंदर्यदृष्टीला भावतील मानवतील असेच श्ब्द, प्रतीमा वाचकाला आपलेसे वाटतात. वाचक त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या काव्यपरंपरेतील त्याच्या सौदर्यदृष्टीला भावतील, मानवतील अशा कविता वाचतो किंवा त्यांचा आस्वाद घेतो. अशाप्रकारे वाचकाची अभिरूची घडत जाते. वाचकाची अभिरूची हळुहळू विस्तार पावत जाते. स्वतःची अभिरूची समृद्ध करत जाणारे असे वाचक सातत्याने नावीन्याचा ध्यास घेतात. असे वाचक सर्जनाच्या प्रक्रियेत सहभागी होतात. यालाच आपण पुनःसर्जन असे म्हणतो. असे वाचक कवीला अभिप्रेत असलेल्या कवीतेच्या शक्यतेच्या पुढे जाऊन कवितेचं वाचन करतात. जी कविता अशा सर्जनशील वाचकाच्या सर्जनशीलतेला आवाहन करत नाही अशी कविता चैतन्य हरवलेल्या जड वस्तूसारखी मृतप्राय म्हणावी लागेल.

थोडक्यात वाचक केवळ कविता वाचत नसतो तर ती वाचता वाचता तो निर्मीतीदेखील करत असतो. तो जे वाचतो त्याला आपल्या मनात दृष्यरूप देण्याचा प्रयत्न करतो. कवितेचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतो. कविता लिहीली गेल्यानंतर तिला परत जिवंत करण्याचं काम, प्रवाहीत करण्याचं काम खरया अर्थाने वाचकच करत असतो. किंबहूना असे म्हणता येईल की वाचक नसेल तर कविता जिवंत होणारच नाही. कवितेतून जी अनुभूतीची शक्यता असते ती साकार होणार नाही. चांगला वाचक निर्मीतीप्रक्रियेत अशाप्रकारे योगदान देत असतो.

**3.**

*जीवनाच्या व्यामीश्र अनुभवाचा स्वतः लेखकालाच संपूर्ण अर्थ कळला असेल याची काय हमी□ तेव्हा कवीने वा लेखकाने जीवनानुभव सादर करावा व त्यावर भाष्य करणं टाळावं, किमान अप्रत्यक्ष भाष्य करावं. आधुनीकवादी सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने हे महत्त्वाचं आहे की, वाचकानेच पुढाकार घेऊन जीवनानुभवाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा. पारंपारीक वाङ्मयाच्या सौंदर्यशास्त्रात सर्व सुत्रे लेखकाच्या हातात असतात. लेखकाने रिंगमास्तराची भुमीका बजावायची असते. मात्र आधुनीक सौंदर्यशास्त्र म्हणतं की, लेखकाची ही दादागीरी कशासाठी□वाचकालाच अर्थनिर्णयात पुढाकार घेऊ दे.* (विलास सारंग . . . . .)

'जे न देखे रवी, ते देखे कवी' यासारख्या अगदीच भोंगळ आणि तकलादू म्हणी आपल्याकडे प्रचलीत आहेत. अशा म्हणींद्वारे कवीचा गौरव वगैरे करण्याच्या भाबडेपणासोबतच कवी म्हणजे कुणीतरी असामान्य असं प्रस्थापीत करण्याचा शहानपणाही आहेच. कवीला असामान्यत्व बहाल करण्याच्या या अट्टाहासापायी कवीतेचं वाचन हे कवी सांगेल तसं करण्याची करण्याची सवय अनेक वाचकांना होऊन जाते. आणि असे वाचक झापडबंद डोळयांनी कवीतेचं वाचन करत 'व्वा! व्वा!! क्या बात' करून फुटकळ दाद देतात आणि तेथेच कविता संपून जाते. कवितेचं अर्थनिर्णयन करण्यात वाचकाची जी भुमीका आहे ती याठिकाणी बजावलीच जात नाही. खरया अर्थाने निर्मीतीप्रक्रीयेची जी शक्यता अजमावली जाण्याची अपेक्षा वाचकाकडून आहे ती पूर्ण केली जात नाही. निर्मीतीप्रक्रियेतून वाचकाने असे अंग काढून घेतल्यानंतर मग कवी शेफारतोच□त्याला असे वाटू लागते की जीवन जे कळले आहे ते आपल्यालाच. तेव्हा आपण कवितेतून जे काही बकू तेच अंतीम. म्हणजे आपल्याला जे काही सांगायचंय तेच नेमकं वाचकांपर्यंत पोहचलं म्हणजे झालं. अशाप्रकारे वाचकाला घास भरवण्याची अतिरीक्त जबाबदारी कवी निर्लज्जपणे आपल्या खांदयावर घेतो आणि कोलमडून पडतो. वाचकांना आता आपण शिकवूया जीवन कसं असतं ते असा निश्चय करून निर्मीतीच्या प्रांतात उतरलेला कवी जीवनाविषयीचं उथळ चिंतन उबवतो आणि त्यातून उथळ कविता निपजतो. अशा उथळ कवितांचा सुळसुळाट आज आपल्या अवतीभवती फारच झालेला आहे. हेच कवी त्यांना जे नेमकं कळलेलं आहे असं त्यांना वाटत असतं ते नेमकेपणाने वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी वेगवेगळया क्लृप्त्या योजतात. यातील मुख्य क्लृप्ती म्हणजे विरामचिन्हांचा सढळ हस्ते वापर करणे. विशेषतः

अवतरणचिन्हे, उद्‌गारवाचक चिन्हे, टिंब टिंब टिंब . . ई . असले विविध पोरखेळ कवी करत राहतो . आणि उथळ वाचक 'वा! कवीने बघा कसं नेमकेपणानं सांगीतलंय' म्हणत बालीश दाद देत राहतात . यातून ना कविता वाढत, ना वाचकाची अभीरूची, ना कवीचं कवीपण . सगळंच खुजं राहतं . फेसबूकने तर असं खुजंपण टिकवून ठेवण्याची आयती सोयच करून ठेवली आहे . फेसबूकमुळे हे टिंबटिंब वाले कवी रात्री कविता लिहीतात आणि सकाळी प्रातःविधीच्या आधी कविता फेसबूकवर पोस्ट करून मोकळे होतात . संध्याकाळपर्यंत त्या कवितेच्या पायाशी शेकडो लाईक्सचा आणि कमेंट्सचा खच पडलेला असतो . कवी खुष . वाचकही आपल्या लाडक्या कवीची आणखी एक कविता वाचायला मिळाली म्हणून खुष□अशा कवींच्या विळख्यातून वाचकाला सोडवून वाचकाला अधीक निर्मीतीक्षम व्हायला भाग पाडणे हेच मला वाटते वाचनसंस्कृती वाढविण्यासाठीचं सर्वात निकडीचं काम आहे .

एखादा कवी जेव्हा अवतरणचिन्हांनी किंवा टिंबटिंब ई . अनावश्यक तोरणांनी कविता सजवण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला काय साधायचं असते□तर अवतरणचिन्हांनी मंडीत शब्दाकडे वाचकाचं लक्ष वेधायचे असते . थोडक्यात वाचकाला कविता वाचण्यासाठी मार्गदर्शन करण्याचं अतिरीक्त काम कवी अंगावर घेतो . डॅश डॅश किंवा डॉट डॉट द्वारे कवी नेमका काय परीणाम साधू इच्छीतो कळायला मार्ग नाही पण या चिन्हांच्या योजनेद्वारे कवी गंभीरतेचा किंवा गुढतेचा आव आणण्याचा प्रयत्न करत असावा . अशाप्रकारे वाचकाला मार्गदर्शन करण्याची गरज कवीला का निर्माण होत असावी□मुळात ज्या कवीला आपल्या भाषीक क्षमतेवर आणि कवीतेत योजलेल्या शब्दांवर भरवसा आहे . त्याने हे अतिरीत्त सजावट काम करण्याची गरजच नाही . तरीही कवी असं करतात याला माझ्या मते दोन कारणं संभवतात .

1 . कवीचा स्वतःच्या भाषीक क्षमतेवर किंवा शब्दांवर, थोडक्यात स्वतःच्या कवी म्हणून असणारया क्षमतेवर विश्वास नसावा .
2 . कवीचा आपल्या वाचकांच्या आकालनक्षमतेवर विश्वास नसावा .

पहिल्या कारणामध्ये सामावले जाणारे कवी हे मुळातच दुय्यम, तिय्यम दर्जाच्या कवीता प्रसवतात . अशा कवींनी स्वतःची सौंदर्यदृष्टी विकसीत करण्याचा प्रयत्न केलेला नसतो . आपली काव्य परंपरा काय याविषयी ते अनभीज्ञ असतात . असे कवी शब्दांची, प्रतिमांची उचल करतात . त्याच त्याच पारंपारीक शब्द, प्रतिमा घडवण्यात त्यांना धन्यता वाटते . आणि जरा कुठे एखादा वेगळा शब्द वापरलाच या कवींनी तर त्या शब्दाला अवतरणचिन्हांच्या नजरकैदेत टाकून हे कवी वाचकांना सांगणार 'बघा, बघा वाचकहो कसा भारी शब्द योजलाय .' असे कवडे फार लांबचा पल्ला गाठू शकत नाहित . पाच पन्नास कविता फारतर लिहील्या की यांच्या तथाकथीत प्रतिभेला ओहोटी लागते . आणि मग त्याच त्याच कविता घोटाळत राहण्याव्यतिरीक्त दुसरं काहिही नवनिर्मीती म्हणता येईल असं काम या कवींकडून होत नाही .

दुसरया प्रकारात मोडणारे कवी वाचकांना कमी लेखतात . त्यांना अशी भिती वाटते की त्यांची कविता वाचकाला व्यवस्थित कळणार नाही, वाचक आपल्या कवितेचा आणखी काहितरी वेगळाच अर्थ काढेल . नपेक्षा आपणच त्याला आपला हा कवितेचा अतिमौलीक घास भरवलेला बरा□

वाचकांच्याबाबत अशाप्रकारे पुर्वग्रह बाळगणारे कवी स्वतःला सगळं काही कळलेलं आहे असा भलताच ग्रह करून घेतात. आणि मग आपल्याला जे कळलेलं आहे ते लोकांना सांगण्याची देवदत्त जबाबदारी कवी आपल्या शिरावर घेतो. त्याला अशी काही गोष्ट कळलेली असते जी त्याच्या भाबडया वाचकाला कळलेली नाही असे कवीला वाटते. अशा कवीचा जिवनाचा शोध थांबलेला असतो. असा कवी जीवनाबाबत काहिएक निष्कर्षाप्रत आलेला आसतो. 'जे न देखे रवी . . .' सारखी अति भोंगळ उक्ती या अशाच कवींच्या फाजील गौरवा प्रीत्यर्थ बोलली जाते.

कवी, कविता आणि वाचक यामध्ये कवीचं स्थान हे शेवटच्या ठिकाणी असायला हवं. प्रथम वाचक कारण तो आस्वादन करणार आहे. आस्वादनाशिवाय कविता, कविता बनू शकत नाही. म्हणजे एखादया कवीने कविता लिहिली आणि ती तशीच ठेऊन दिली म्हणजे वाचली गेली नाहि तर त्या कवितेच्या अस्तित्वाला काहि अर्थ राहिल काय□जर एखादी कविता वाचलीच गेली नाही तर ती कविता, कविता कशी ठरणार□वाचकाच्या आस्वादनामुळेच निर्मीतीचे चक्र पुर्ण होते. कवितेचं अस्वादन करण्याचं पूर्ण स्वातंत्र वाचकाला दिलं गेलं तर एखादया कवितेचे अनेक अर्थ निपजू शकतात. त्या विशीष्ट कवितेतून मिळणारी अनुभूती ही वाचकागणीक वेगवेगळी असू शकते. अशाप्रकारे अर्थाच्या अनेक शक्यता निर्माण करणारी कविता काळाच्या कसोटीवर टिकून राहते. गालीब किंवा तुकाराम हयांची कविता आजही वाचकाला भुरळ का घालते□गालीबच्या एका गजलेला एकाच वेळी दहा वेगवेग्ळया संगीतकारांना दहा वेगवेगळया चाली का सुचतात□कारण या महाकवींनी कधीच आपल्या वाचकांना पढवण्याच्या उद्देशाने कविता लिहिली नाही. तर वाचकाला शोध घ्यायला प्रवृत्त करणारया रचना या कवींनी लिहील्या. आजचा चांगला वाचक हयाच वैशीष्टयांमूळे गालीब तुकारामांच्या रचनेकडे आकृष्ट होतो. चांगला, सर्जनशील वाचक नेहमीच अशा अनेकार्थाच्या शक्यता असणारया कवितेच्या शोधात असतो. दुय्यम तिय्यम दर्जाचे वाचक मात्र अशा कवितांच्या वाटेला जात नाहित. अनेकार्थाच्या शक्यता असणारी कविता अशा वाचकांना कठीण वाटते. अशा वाचकांसाठी गालीबनेच सांगून ठेवले आहे.

मुश्कील है जब्ज कलाम मेरा ऐ दिल, सुन सुन के उसे सुखनवरने कामील
आसान कहने की करते है फर्माइश, गोया मुश्कील वर्ना गोया मुश्कील
(मान्यय मी कठीण लिहीतो, ते जेव्हा वाचतात माझे शब्द, जेष्ठ कवी मला सल्ला देतात जरा समजेलसं लिही, मित्रांनो लिहीणं कठीण होईल जर मी कठीण लिहीलं नाही)

**इग्नेशियस डायस**

नमस्कार ख्रिस्ता,

कसा आहेस? बराच असशील. इतकी छान प्रसिद्धी मिळतेय ना तुला.
उस चर्च के परदे पर अपने आपको पाकर और उसे देखने उमडी भिड को देखकर आप कैसा महसूस कर रहे है? मस्त ना? केवढी ही प्रसिद्धी!!! तुलापण प्रसिद्धी आवडते का रे? माफ कर हा, खूप प्रश्न विचारले ना मी. पण मी तरी काय करू, आपण एखाद्या गोष्टीच्या कितीही विरोधात असलो किंवा आपली भूमिका कितीही ठाम असली तरी जनमत आपल्या विरोधात असलं की असे प्रश्न पडतातच रे. काय करू शेवटी मी पडलो एक मँगो मनुष्य.
ए…ए ख्रिस्ता, तू तर असामान्य आहेस ना?...सांग ना तुला पण असे प्रश्न पडतात का रे? म्हणजे, प्रवाहा विरूद्ध पोहताना तुला तुझ्या मतांचा कधी पुनर्विचार करावासा वाटतो का रे? मला माहीत आहे तुझं उत्तर नाही असंच असणार. तू काय बाबा असामान्य. मी पडलो एक मँगो मनुष्य.
ख्रिस्ता तुला म्हणून सांगतो हा, मी पण ना हल्ली तुझ्यासारखाच वागू लागलोय. म्हणजे जे माझ्या तत्वात बसत नाही किंवा जे सद्सद्विवेकबुद्धीला पटत नाही त्याच्या विरूद्ध बोलायचं किंवा निदान अशा गोष्टींना पाठिंबा तरी नाही द्यायचा. हसू नकोस आम्हा मँगो मनुष्यांची देखील तत्वं असतात बरं. हा, तर काय म्हणत होतो मी?...हो, जे पटत नाही त्याला पाठिंबा नाही द्यायचा मग भले पूर्ण समाज माझ्या विरूद्ध का असेना....काय? बरोबर करतोय ना मी.
ख्रिस्ता वेरोणीकेचा रुमाल ते आजचा हा पडद्यावरील तुझा चेहरा ह्यामधील काळात पुलाखालून बरच पाणी वाहून गेलंय रे. पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी नाही असे अनुमान मांडले म्हणून शास्त्रज्ञांना शिक्षा झालीये, हमखास स्वर्गात जायचे पासेस विकले गेलेयत, जगभरातील तुझ्या पुतळ्यांच्या कुशीतून रक्त वाहून झालय, कधी भाकरीत तुझा चेहरा दिसलाय तर कधी ढगात तुझी प्रतिमा लोकांना दिसली आहे. तुला सांगू का ख्रिस्ता मला ना हे सगळं कधी पटलंच नाही म्हणून मी कधी अशा गोष्टींना महत्वही दिलं नाही. पण काल जेव्हा हा प्रकार माझ्या अंगणात घडला आणि त्यावर विश्वास ठेऊन तुझं दर्शन (?) घ्यायला आणि हल्लीच्या प्रघाताप्रमाणे तुझा फोटो घ्यायला लोकांची जी झुंबड उडाली ते पाहून मला माझ्याच तत्वांना आणि विचारांना प्रश्न विचारावासा वाटला रे...हसू नकोस...तुला सांगतो अरे आबाल - वृद्ध सोड, त्यांची सारासार विचार करण्याची कुवत त्यांच्या वयावर अवलंबुन असते असं मानू पण… पण तरुण, मध्यमवयीन, चांगले सुशिक्षित लोक जेव्हा हे प्रकार करताना आणि तावातावाने त्यांच्या दिव्य (?) विचारांचे समर्थन करताना पाहिले तेव्हा काय करावे हेच सुचेना...मग विचार केला की थेट तुलाच विचारावे आणि माझ्या मनात चाललेल्या चल-बिचलीचा सोक्षमोक्ष लावावा. बरोबर केले ना रे मी?
तूच सांग ना..हे जे काय चाललंय ते सर्व योग्य आहे का?
तुम्हाला नाही ना पटत मग सोडून द्या ना, आमच्या श्रद्धेच्या (?) आड का येता? अश्या बालीश प्रश्नावर डोळेझाक करावी का? की त्यांना समजावून द्यायचा प्रयत्न करावा? की ते जे काय करतायत ते चूक आहे आणि ही श्रद्धा नाही तर अंधश्रद्धा आहे.
सांग ना ख्रिस्ता...लवकर उत्तर देशील ना रे.....
तोपर्यंत कदाचित त्या पडद्यावरील फोटोंच्या शेकडो प्रती छापल्या जातील, अनेक बस भर भरून लोक तुझ्या (?) दर्शनाला येतील. कदाचित "प्रती अमुक-अमुक" म्हणून ते स्थान नावारूपाला देखील येईल. हे सर्व व्हायच्या अगोदर मला उत्तर पाठव.
मी तुझ्यासारखा "सर्वत्र" जरी नसलो तरी फेसबुक, व्हॉट्सएप, ट्विटर, गूगल प्लस, एम. एस. एन., याहू मेसेंजर अश्या अनेक ठिकाणी आहे. कुठेही मेसेज टाक नाहीतर सरळ फोन कर, माझा नंबर तुझ्याकडे आहेच...निवांत बोलू.

चल बाय!
तुझाच मँगो मनुष्य,
सुनिल डि'मेलो

# अंतरीची हाक

ऑफिसातील आपल्या लॅपटॉपसमोर बसलेला तो आपल्या कामात गुंग होता. संपूर्ण फ्लोअरवर तो एकटा होता. सरासर टाइप होणाऱ्या किबोर्डच्या कीचा आवाज तिथल्या भयाण शांततेला छेद करत होता. थोड्या वेळाअगोदरच वेंडिग मशीन मधून आणलेल्या त्या वाफाळत्या कडक कॉफीचे थंडगार कोल्ड कॉफीमध्ये रूपांतर झाल्याचेही त्याला भान नव्हते. रात्रीचे ८.३० वाजले होते आणि अर्ध्या तासात तो ते प्रेझेंटेशन पूर्ण करून घरी जाणार होता, उद्या सकाळी ते प्रेझेंटेशन बॉसने नजरेखालून घातले की लगोलग होणाऱ्या 'Video Conference' मध्ये त्याला ते सादर करावयाचे होते. कंपनीला मिळालेल्या नवीन प्रोजेक्टच्या implementationसबंधी 'Client'बरोबर चर्चा त्यात होणार होती. आणि प्रोजेक्ट लीडर म्हणून तो ते प्रेझेंटेशन सादर करणार होता.

त्याचा मोबाईल फोन खणखणला.

"Yes sir" तो उत्तरला

"You are still in Office, communicator chat वर तू ऑनलाइन दिसलास म्हणून तुला कॉल केला. By the way, what about tomorrow's presentation, is it ready?" पलिकडील आवाज त्याला विचारत होता.

"It's almost finished, Sir, 2-3 स्लाइड्स नव्याने ॲड केल्याएत, आपल्या लास्ट प्रोजेक्टच्या 'Success Story'च्या, त्यांना 'finishing touch' देतोय, ते झाले की मग निघतोय" त्याने अपडेट दिली.

"Anyways, तू जास्त दगदग करू नकोस, घरी जा आता, उद्या भेटूया, VCच्या वेळी." बॉसला सुद्धा जाणीव होती त्याच्या अपार मेहनतीची, त्यामुळे त्याने त्याला घरी जाण्यास सांगून फोन ठेवला.

मर्विन, टीसीएस सारख्या आयटी क्षेत्रातील नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपिंग मॅनेजर म्हणून काम करणारा एक कामसू, हरहुन्नरी तरुण…… शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'सेंट फ्रान्सिस इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बोरीवली' या संस्थेतून प्रथम 'कम्प्युटर टेक्नॉलॉजी'चा डिप्लोमा नंतर तेथेच 'कम्प्युटर इंजीनिअरिंग'ची पदवी विशेष प्राविण्यासह संपादन...... कॅम्पस इंटरव्ह्यु चांगल्या प्रकारे दिल्यानंतर "इन्फोसिस" सारख्या ख्यातनाम कंपनीमध्ये प्लेसमेंट...... परंतु आणखीन शिक्षण घेण्याची हौस फिटली नव्हती...... म्हणूनच इन्फोसिसची प्लेसमेंट झिडकारून GRE व TOEFEL या परीक्षा यशस्वीरीत्या देवून त्याने यूनायटेड स्टेट्समधील न्यूयॉर्क येथील "न्यूयॉर्क इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी"मध्ये MS करण्यासाठी प्रवेश...... दिड वर्षाचा अभ्यासक्रम हा हा म्हणता पूर्ण करून विशेष प्राविण्यासह मास्टर्स डिग्री मिळवून स्वदेशी परत......

हाडाचा सामाजिक कार्यकर्ता होता मर्विन, अभ्यासाचा डोलारा सांभाळत त्याने चर्चवरील युवा संघटनेचा अध्यक्ष म्हणून लागोपाठ 3 वर्षे उत्कृष्ट असे काम केले होते, त्याच्या कारकिर्दीत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम पॅरिशपातळीवर झाले होते तसेच त्याच्या कर्तुत्वाची पोचपावती म्हणजे धर्मप्रांतीय युवा संमेलनाचे यजमान म्हणून यशस्वी आयोजन..

टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (TCS) जॉइन करण्यामागे सुद्धा त्याचे सामाजिक बांधिलकीचे भानच कारण होते, नोव्हे. 2008 मध्ये मुंबई टेरर अटॅकच्या वेळी तो न्यूयॉर्क येथे त्याच्या मास्टर्स डिग्रीच्या अंतिम टप्प्यात होता, त्यावेळी त्याच्या एका मित्राने पाठवलेल्या रतन टाटा यांच्या दातृत्वासबंधीच्या एका ईमेलने त्याला फार प्रभावित केले होते आणि त्यामुळे त्याने स्टेट्समधल्या नोकऱ्या धुडकावून TCSमध्ये अप्लाय केले आणि सगळ्या इंटरव्ह्यू व्यवस्थित पार पडून रीतसर जॉइन केले होते. अल्पावधीतच आपल्या अंगभूत कौशल्याने त्याने आपली छाप पाडली होती आणि तो चांगल्या पदावर पोहोचला होता.

'करे मर्विन, यी कय घरा यासा टाईम झाला आ रे, तू राती फक्त निज्या येता गा का घरा, हाकोटे काळोखाये उठोन परत जासो, जिव्या-खा सा कय भान-बिन हाय गा नाय तुला, आख्या ऑफिससा काम तुला एकट्यालास दिले गा का?" मर्विनची आई मर्विनने घरात पाऊल टाकताच त्याच्यावर कातावली होती. रात्रीचे ११.००

वाजले होते आणि मर्विन नुकताच घरी पोहोचला होता आणि सकाळी ६-०० वाजता उठून ६.४७ च्या अंधेरी स्लो ने परत तो ऑफिससाठी निघणार होता.

"मम्मे, ताहा कय नाय ला, पन आपल्या दरी जी जबाबदारी दिले ती आपुन पार पाडली पाय गा नाय" मर्विनने आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.

"माला माईती हाय सगळा, सल जीव्यादो सल आते" आईने वेळेचे भान राखून विषय आटोपता घेतला.

त्याला वाढून त्याच्या बाजूला बसलेल्या आईची चुळबुळ चालू होती, तिला त्याच्याशी काहीतरी बोलायचे होते पण सुरुवात कशी करावी हे तिला समजत नव्हते. तेवढ्यात स्वयंपाकघरात पाणी पिण्यासाठी आलेल्या मर्विनच्या पपांकडे तिचे लक्ष गेले, तिने खुणेचा दृष्टिक्षेप टाकला, तेही बाजूला येवून बसले.

"मर्विन, येत्या जुलै मयन्यात तू २८ वहराव होवेदा, आते कोडा थांब्यासा रे, आज हानसो मामा येवोन गेलो, त्या मित्रायी पोरी इंजीनियर झाले, ती बद्दल तो हांगातोतो, ती मस्त पोरी हाय रे, साधी भोळी, आपल्या फॅमिलीमिने मस्त फिट होवेदे अही हाय, तू यावर विसार कर ना जरा" पप्पांनी एका दमात मनातील सगळे सांगून टाकले. आईच्या चेहऱ्यावर आता शांत भाव पसरले होते. मर्विन खाली मान घालून जेवत होता, अचानक त्याचा चेहरा गंभीर झाला, त्याने "विचार करून सांगेन" असे मोघम उत्तर देवून जेवण संपविले.

मामाच्या मित्राच्या त्या मुलीला, डेलनाला तो ओळखत होता, तो सेंट फ्रान्सिसला इंजीनियरिंगच्या दुसऱ्या  वर्षाला असताना तिने डिप्लोमा जॉइन केला होता, उत्तर वसईतील विद्यार्थ्यांचा ५० जणांचा ग्रुप होता, त्यात दोघेही होते, आणि त्याच्या मामाची मुलगी, रोशलही होती, ती याला नेहमी काही अडखळले की विचारायला यायची त्यावेळी तिच्याबरोबर डेलनाही असे. डेलना सालस, बुजऱ्या स्वभावाची होती.

आपल्या रूममध्ये पलंगावर पहुडल्यावर तो विचार करत होता, गेले काही दिवस झाले त्याचे मन अचानक निराश होत होते, अनेकदा अचानक तो विचारात गढून जात होता. खूप बेचैनी व उदासिनता त्याच्या मनाला आली होती, मन मनास उमगत नव्हतं, जीवनाचा आनंद कुठेतरी हरवला गेला आहे असे त्याला वाटत होते, अनेक प्रश्न त्याच्या समोर उभे ठाकले होते. तो अंतर्मुख झाला होता. त्यातच समाजात, देशात घडत असलेल्या काही घटनांनी त्याचे मन आणखी उदीग्न होते.

आपल्या समाजात भावाभावात चालेलेले वाद..... फुटभर जागेसाठी होणारी भांडणे..... आदर्श जीवनाची तत्वे बाजूला ठेवून समाजात वाढत चाललेला चंगळवाद..... देशभरात चालेलेले अनेक अत्याचार..... राजकीय नेत्यांचे अनेक घोटाळे व गुंडगिरी.....

हे सर्व वाचल्या-बघितल्यावर त्याला माणसाच्या वासना, पैशाची हाव आणि सत्तेचा माज याचा तिटकारा येत होता. यासाठी आपण काहीच करू शकत नाही किंवा माणूस ह्या गोष्टीपासून परावृत होवू शकत नाही याची त्याला खंत वाटत होती. माणुसकी जणू गटारातल्या पाण्यासारखी गढूळ होवून वाहत होती. ऑफिसमध्ये टी टाईमला किंवा लंचच्या वेळी या विषयावर चर्चा होत त्यावेळी तो पोटतिडकीने या विषयी बोलत असे परंतु त्याचे सहकारी त्याला "अण्णा हजारे' म्हणून चिडवत असत.

सकाळी नेहमीप्रमाणे तो लवकर ऑफिसला पोहोचला, बॉसने उत्तम प्रेझेंटेशन असल्याचा अभिप्राय दिला, त्यानंतर झालेल्या VCमध्ये त्याचे उत्तम असे सादरीकरणही झाले, 'Client' अतिशय खुश झाला होता आणि हे नवीन प्रोजेक्ट 100% यशस्वी होणार याची त्याला ग्वाही मिळाली होती, आठवडयाभरातच 'Financial Agreement' साईन होवून मोठ्या रकमेचा चेक ॲडवान्स म्हणून मिळाला.

मर्विन जोमाने या प्रोजेक्टच्या कामाला लागला, ५ जणांच्या टिमची निवड त्याने केली. टिमला प्रोजेक्ट डिटेल्स विषयी सगळी कल्पना देवून सगळे कामाला लागले, प्रोजेक्ट चांगल्या प्रकारे आकार घेत होते परंतु मर्विनच्या मनातील नैराश्य मध्येच उफाळून येत होते, रात्र रात्र तो विचारमग्न अवस्थेत जागून काढत होता.

उपवासकाळाला सुरुवात झाली होती, आज पहिला रविवार होता, संध्याकाळी ५-३०च्या पासाच्या भक्तीचे शुभवर्तमान फादर वाचत होते, "माणसाने सारे जग कमावले आणि स्वत:चा आत्मा गमावला तर काय लाभ"

मर्विनच्या कानावर हे शब्द पडताच तो अस्वस्थ झाला. पुन्हा पुन्हा ते वाक्य त्याच्या कानावर आदळत होते, त्यातच प्रवचनामध्ये फादरांनी या वाक्यावर आधारित त्यांच्या वाचनात आलेली एक चारोळी वाचली

माणसाने सारे जग कमावले व स्वत:ला गमावले

तर काय लाभ ?, येशू म्हणतोय

मला उमगले तेव्हा फुलांची चादर, त्यात कलेवर निपचित पहुडलेले,

हात दोन्ही रोझरीने बांधलेले होते.

म्हणजे मरणाच्या दारात असताना मला माझ्या पापांची आठवण होणार आहे का? मी या जगात येवून काय केले, काय नाही याची शहानिशा करण्यासाठी माझ्याकडे वेळच नाहीय? मर्विनची अस्वस्थता क्षणोक्षणी वाढत होती.

“फादर, मी काय करू मला समजत नाही, हे जीवन, गलेलठ्ठ पगाराची नोकरी, मिळत असलेला मानसन्मान, सगळं मला निरर्थक वाटतय, हे सगळं सोडून द्यावंसं वाटतय, काय करू ते समजत नाही”

मर्विन आपले अस्वस्थ मन फादरांपूढे मोकळे करत होता.

“तुला प्रभूच्या मळयात काम करण्याची हाक आली आहे, तुझे मन ती हाक अंतरी सामावण्यास कचरत आहे, म्हणूनच तुझी द्विधा मनस्थिती झाली आहे” फादरांनी मर्विनच्या डोळ्यात पाहत त्याला म्हटले.

“तू घरी जा, शांत चित्ताने विचार कर आणि तुला त्यानंतर काय वाटते ते मला येवून सांग” त्या भेटीचा समारोप करीत फादर त्याला म्हणाले.

प्रोजेक्टचे काम जवळजवळ संपत आले होते. वेळेवर आणि उत्कृष्ट असे काम करून हेही प्रोजेक्ट मर्विन व त्याच्या टिमने यशस्वी केले होते.

आज clientला Final handover द्यायचे होते प्रोजेक्टचे, मर्विनने सगळी डिटेल्स तयार ठेवली होती. सर्व सोपस्कार पार पाडल्यानंतर तो आपल्या आपल्या लॅपटॉपसमोर बसला होता. टिमचे अभिनंदन करणारा ईमेल त्याने संपूर्ण ऑफिसला पाठवला, त्याचबरोबर दूसरा ईमेल त्याने आपल्या बॉसला पाठवला. बॉस हातचे काम सोडून बाहेर आला.

“मर्विन, are you joking, today is not 1st April yaar, या ईमेलचा अर्थ काय?, तू हा जॉब सोडून चाललायेस?, But what’s the reason, असा अचानक तडकाफडकी निर्णय का?” बॉसचा अजूनही विश्वास बसत नव्हता.

“सर, मी सेमिनरी जॉइन करायचा विचार केलाय, I want to become a Priest, मी जूनमध्ये ‘जेजुईट” संघात सामील होत आहे.” मर्विन ठाम निच्छयाने बोलला.

“पोरा, सगळयो सुख-सोयी पाया दरी होवोन सुद्धा तू अहो क विसार केलो रे, आम्हाला होडोन जादो तुला कय वाटे कहा नाय रे” डोळ्यातील आसवे टिपत मम्मी त्याला विचारत होती.

“मम्मे-पप्पा, सगळो विसार करोनुस म्ये छातीओर दगड ठवोन यो निर्णय घेतले, तुमाला होडोन जादो माला पन बरा नाय वाटे, पण माआ लाईफसो यो नवीन मार्ग त्याने (परमेश्वर) माकरता निवडले आन त्या मार्गोरूस सल्यासा हाय माला” आपला ठाम निर्धार तो आपल्या आईवडिलांना समजावत होता.

त्याचा निर्णय झाला होता. अंतरीची हाक ऐकून अस्वस्थ मनावरील मळभ दूर करण्यासाठी सगळे पाश तोडून त्याने सेमिनरीची वाट धरली होती.

**ख्रिस्तोफर रिबेलो, चौकाळा**

## कविता / चारोळया :-

" प्रेम...! "

कुणी म्हणत ,
करायलाच हवं .
कुणी म्हणत ,
नकोच !

कुणी म्हणत ,
सुंदर असत .
कुणी म्हणत ,
फक्त प्रश्नचीन्हांकित काळोख !

कुणी हसे
अल्हादाने .
कुणाचे
होई हसे .

परी ख्रिस्त म्हणे ,
प्रेमच...!
प्रेमच ते ज्यात ,
अवघेची विश्व
घडलेले , वाढलेले अन
बांधलेले असे एक .

----- कु. सबिना फोस ( गास )

" जागर "

आज झाली तशी रात्र
कालही झाली होती
तरी उद्या पुन्हा होईल सकाळ

आज झाली तशी

आजही नाही आले कुणी
उद्याही उठवायला येणार नाही कुणी
तरीही आपले आपणच उठायचे
कुणीही नाही उठले तरी

अन सांगत  फिरायचे
जो भेटेल त्याला ,
" उठा - उठा हो सकाळ झाली ! "
 अगदी दिवस मावळेपर्यंत ;
अन झोपवणारे कुणी भेटेपर्यंत          ----- कु. सबिना फोस ( गास )

## कोण साद घालते आहे मला ?

कोण साद घालते आहे मला
झाकल्या मनाच्या गाभाऱ्यातून ?

मॉल संस्कृतीच्या वासनेला बळी पडलेल्या
सरकार दरबारी हक्कासाठी भिकारी बनलेल्या
उध्वस्त गिरणी कामगारांचे अश्रू..

दलाल, व्यापारी यांनी मानगूट पिळलेल्या
कर्जाऊ रकमेच्या परतफेडीसाठी बॅंकांनी घेरलेल्या
चिंताग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या...

श्रीमंतांच्या चैनीसाठी हक्काच्या जमिनी गमावलेल्या
जमिनदार असूनही भूमिहीन झालेल्या
धरणग्रस्त निर्वासित लोकांचे हक्क..

टिव्ही, मोबाईलच्या नादात मैदान विसरलेल्या
इंटरनेटच्या मोहजालात चिऊ -काऊच्या गोष्टींना पारखे झालेल्या
लहान मुलाचं हरवलेलं बालपण..

ढोर मेहनत करून उच्चशिक्षित झालेल्या

करिअरच्या नावे वैयक्तिक नातेसंबंध विकलेल्या
नैराश्याने ग्रासलेल्या कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांचे मन...

स्टेटस सिम्बॉलसाठी वरचेवर पार्ट्यांत रमणाऱ्याच्या
प्रत्येक गोष्टींसाठी आयांच्या मागे धावणाऱ्या
चार भिंतीत गुदमरलेल्या एकट्या मुलाचं एकाकीपण...

क्षमता असूनही नेहमी उपेक्षित राहिलेल्या
केवळ खर्चाचं प्रतिक म्हणून गणलेल्या
घरातील थोरल्या मुलीच्या अंतः करणातील दुःख...

तप्त शरिराची भूक भागवून
समाजात उजळ माथ्याने फिरण्यासाठी
उकिरड्यावर फेकून दिलेल्या निष्पाप बाळांचे आक्रोश...

कोण साद घालते आहे मला ?
मनाच्या अंधाऱ्या विचारांत
विखुरलेले शब्द
की,
विखुरलेल्या शब्दांना
एकत्र करू पाहणारी
कविता..

कोण साद घालते आहे मला ?
कोण साद घालते आहे मला ?

## तुला जन्मायला हवं..

ते विचारात गेले
प्रश्नांवर प्रश्न..
तू मात्र निशब्द
त्याचीच शिक्षा दिली तुला
डोकी काटेरी मुकुट
हातापायां खिळे ठोकून..
तू उठलास मरणातून आणि
संधी मिळाली आम्हांला
आणखी एका पार्टीची..

पण तू असा उभा का?
दूर उंच कालवारीच्या कड्यावर..
तुला तर आम्ही जन्माला घातलंय
लखलखीत दिव्यांच्या गोठ्यात
सालाबादप्रमाणे...
तू कंटाळला असशील, थकला असशील
जन्म, मृत्यू नंतर मरणावरील विजय
सततच्या या चक्राला..
प्रत्येकवेळी सादर केली असेल तुला
उंची पेयं आणि मसालेदार चमचमीत खाणं
यानंतर स्नानसंस्कर, वाढदिवस, लग्नसोहळे
कार्यक्रम ठरलेलेच
नाकारता येणार नाही भेट देणं तुला..
आता पोटाचा घेर बदलल्याचं जाणवतंय
जाणवतोय तुला
थोडसं चालल्यावर थकवा
थरथरून फुटतो घाम सर्वांगाला
जपावी लागते गोळी खिशात
रक्तदाब, कोलेस्ट्रोल वाढू नये म्हणून..
उबग आला असेल तुला या साऱ्यांचा
म्हणूनच तू उभा असशील
दूर टेकडीवर
आमची वाट पाहत..
आम्ही येऊ
पण त्याआधी तुला
आमच्या मनात, हृदयात
जन्मायला हवं...

एडवर्ड डिसोजा

मुला-सुना सारखे मज, कुणी छळंले नाही!
का ठेवले मागे मजला, अजून कळले नाही!

ती गेली निघुनी एकटी, मजला मागे सोडूनी,
भोगतो मरणयातना आज, आधार कुणाचा नाही!
तिचे जाने देवा, का तेव्हा टळले नाही,

का ठेवले मागे मजला, अजून कळले नाही!

मी पोरका एकटा, सोसतो तिच्या विना,
माझ्याच घरकुलात रडतो, लाचार क्षणा क्षणा,
माझ्या म्हातारपणाचे ओझे, मलाच कळले नाही,
का ठेवले मागे मजला, अजून कळले नाही!

ज्या पुत्रास मी वाढविले, ते माझे कधी न झाले,
पत्नीच्या पदरा आड, मजला विसरून गेले!
या अजीब जीवनाचे फासे, मज कळले नाही,
का ठेवले मागे मजला, अजून कळले नाही!

भेटेल जेव्हा तिला, कसे प्रेमगीत गाऊ?
कसे नाडले आपल्यांनी, उत्तर कसे मी देऊ?
आपल्याच बापाशी त्यांचे, नाते जुळले नाही,
का ठेवले मागे मजला, अजून कळले नाही!

घे बोलवुनी सखे मजला आता तुझ्याकडे,
घुसमट होते माझी, आपल्याच नात्यामध्ये,
माझ्या यातनात त्यांचे, डोळे निथळले नाही,
का ठेवले मागे मजला, अजून कळले नाही!

सचिन मेंडीस

योसेफाबरोबर तुझं वाग्दान झालेलं,
तू इतर कुमारीकांसारखी,भावी आयुष्याची स्वप्नं बघत होतीस.
परंतु दुताचा तुला निरोप आला,
आणि तुझ्या स्वप्नाचा चक्काचूर झाला.
तू घाबरली, भेदरली असशील.
पण एक अभूतपूर्व ,धाडसी निर्णय तू घेतला.
आणि देवाच्या शब्दाला होकार दिला.
बाळंतपणासाठी तुला सर्वांनी जागा नाकारली,

तुला गोठयाचा आधार घ्यावा लागला.
किती राग आला असेल तुला देवाचा आणि स्वतःचादेखील त्यावेळी!
परंतु गव्हाणीत जेव्हा ते दिव्य बाळ जन्मास आले,
तेव्हा तुझ्या हृदयात आनंदाचे झरे खळाळू लागले.
राजे, महाराजे त्याच्यापुढे नतमस्तक होताना पाहून तुला कौतुक वाटले असेल.
कान्हा गावी लग्नातील चमत्काराने तुझा उर अभिमानाने भरला असेल.
आपला ‘लेक’ प्रस्थापितांविरुद्ध उघडपणे बंड पुकारतो,
तुझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती का?
तो क्रुसावर मरण यातना भोगताना,
तुही तीळ तीळ तुटत होतीस.
त्याचं कलेवर कुशीत घेऊन हमसाहमशी रडत होती.
त्याच्या उठण्याने मानवजात तारली,
तूदेखील ख्रिस्ताच्या आईऐवजी,
विश्वाची माता बनून उरली.
मरीये,आज ख्रिस्ताची गरज आहेच,
पण त्याहून जास्त मरीयेची गरज आहे.
हे देवमाते,परत एकदा आम्हासाठी ख्रिस्त प्रसव,
आमच्या मनात देवाविषयी तुझ्यासारखीच श्रद्धा वसव.

‘तो’ येण्याची वेळ जवळ आली.
त्याच्या येण्याची चाहूल निसर्गास लागली.
त्याच्या स्वागतासाठी,
वनराई हिरवा शालू नेसली.
वातावरणाने थंडीची चादर ओढली.
फुलांचे ताटवे बहरले.
निर्झराने मधुर सूर छेडले.
सृष्टीत नवचैतन्य पसरले.
नभी नवे तारकामंडल अवतरले.
आपल्या निर्मात्याच्या दर्शनासाठी,
त्याच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी,
हरएक निर्मिती सज्ज झाली.
अपवाद ‘माणूस’
आम्ही सिलेब्रेशनचेच प्लॅन करतो.
त्यासाठीच सारी तयारी करतो.
हे ख्रिस्ता,
ह्यावेळी बेथलेहेमात नको,

नको गाईच्या गोठयात.
यंदा आमच्या हृदयात तू जन्म घे.
मीपणा अमुचा चोरपावलांनी पळू दे.
जीवनाचा अर्थ नव्याने आम्हा पामारांस,
परत एकदा कळू दे.

एमेल आल्मेडा

**आकाश ढगाळून येते..**
**तशी ती येईल याची जाणीव होते..**
**आकाशी वीज चमकते..**
**जणू तिच्या पायातील पैजण झनझनते..**

**जोराचा वारा सुटतो..**
**जणू तशी ती केशांची लाट कानामागे सरकावते..**
**आणि शेवटी पाण्याचा थेंब कोसळतो..**
**जणू ती लांबून हाक मारल्याची भास होतो..**

**त्या मातीचा तो सुगंध येतो..**
**जणू तिच्या त्या सुगंधाचा वास येतो..**
**तो पाण्याच्या थेंब माझ्या अंगावर पडतो..**
**जणू तिने हळूच स्पर्श केल्याची आभास होतो..**

**पावसाबरोबर थंड झालेले ते वातावरण..**
**जणू तिच्या पहिल्या भेटीचे दर्शन घडवते..**
**पावसात आलेले ते सूर्याचे किरणे...**
**जणू तिच्या हसन्याची साक्ष देते..**
**मधेच एकाधा होणारा गडगडात..**
**जणू ती रागवाल्याचे आठवून देते...**

**ते काळे लाल झालेले आकाश..**
**जणू तिच्या सुंदर डोळ्यांचे चित्र रंगवते..**
**एचानक झालेला तो बदल निसर्गाचा..**
**जणू माझ्या मनाची दश्या सांगते..**
**तिच्या भेटीनंतर....**

## *कशी असावी आपली स्वप्नातील परी??*

***स्वप्न तुझे पाहताना आज***
***सुंदरतेचे वर्णन सांगून गेले..!!***

***डोळे तुझे जणू मोरपंखी***
***मला रंगाच्या दुनियेत घेवून गेले..!!***

***केस तुझे जणू रुपेरी वाळू***
***त्याच्या नाजूक स्पर्शाने मला आपलेसे केलेस..!!***

***गाल तुझे जणू पहाटेचा सूर्य***
***दर्शन त्याचे देवून मला आनंदित केलेस..!!***

***वाणी तुझी जणू मधाचा प्याला***
***त्याच्या गोडाव्यात मला वेडे केलेस..!!***

***रूप तुझे जणू कोजागिरीची रात्र***
***सुंदरतेत तिच्या मला मंत्रमुग्ध केलेस..!!***

***स्पर्श तुझा जणू मायेचा ओलावा***
***त्या स्पर्शाने मला बेभान केलेस..!!***

***हसणे तुझे जणू वाऱ्याची शीतल झुळूक..***
***त्याच्या गारव्याने मनाला शांत केलेस..!!***

जॉन्सन लोपीस

## **1) तो राजहंस एक – सचिन तेंडुलकर**

क्रिकेटच्या प्रांगणात उगवला एक तारा
सचिन रमेश तेंडुलकर, भारतीय क्रिकेट तारणारा
क्रिकेट हा खेळ नाही, धर्म त्याने केला.
राज्य त्याचे स्थापन झाले, तो देव त्याचा झाला

कोवळं वय, कारकिर्दीची सुरुवात, तेजतर्रार मारा समोर
नाकाला दुखापत, शाब्दिक टोल्यांना पुरून उरला कणखर
फलंदाजीतच नव्हे गोलंदाजीतही त्याचा बोलबाला
त्याने तो खरा 'हिरो''ही झाला.

'डेझर्ट स्टॉर्म'ने धावांचे वादळ उठविले
प्रतिस्पर्ध्याच्या स्वप्नात येऊन त्यांचे ढाबे दणाणविले
मुजखोरांचा माजही २००३च्या विश्वचषकात उतरविला
विक्रमांचे एव्हरेस्ट चढून तिथे एकटा विराजमान झाला

मैदानावर सहकाऱ्यांना मार्गदर्शन करीत उत्साहिले
नवोदितांना संयमासह खेळण्यास प्रोत्साहिले
२०११ च्या विश्वचषकात स्वप्नपुर्तीचे अश्रु नयनी दाटले
आयूष्यभर अपेक्षांचे ओझे उचलणाऱ्या त्याला आपल्या खांदयावर उचलले

त्याच्याविषयी बोलताना भावनाही क्रिकेटरसिकांच्या ओथंबल्या
निगर्वी अन नम्र व्यक्तिमत्वाने त्या नखशिखांत भारावल्या
आहे माणूस म्हणून महान अन खरा खेळाडू जंटलमन
अलौकिक प्रतिभा, असामान्य कर्तुत्व, जगत्प्रिय मूर्तीमंत स्वप्न

कोवळ्या किरणांनी आल्हादविणारा उगवता सूर्य सारी सृष्टी उजळवितो
क्षितिजाकडे झुकत मावळतीच्या सावलीनेही उल्हासवितो
झळाळून टाकले सारे क्रिकेटविश्व आपल्या तेजाने सदैव
तो राजहंस एक – सचिन तेंडुलकर एकमेव...

## 2) मला एक दिवस "भाटात" जायचंय

मला एक दिवस "भाटात" जायचंय
बैलाची पाग हातात घेवून त्याला नांगरणीसाठी घेवून जायचंय
''नांगर-जोहार-बैल'' जोडून ''उखळण'' करीत शेत नांगरायचंय..
''अळी''वर बसून ''डेफे'' फोडीत संपूर्ण शेतभर हुंदडायचंय
कुदळ-फावड्याने कुडवणी करीत ''वाप्या''मध्ये शेत सजवायचंय
रहाटाला झुंपलेल्या बैलाच्या मागे "हाईक, हाईक" करत फिरायचंय

पोन्दळातील पाणी दांडातून झुळझुळ वाहत असताना त्यात डुंबायचंय
शेतातील हिरव्यागार रोपाला "बंधनं" बांधून ते पोहोचवायचंय
"वाप्यावाप्याला" फिरवून संपूर्ण शेतात ते खेळवायचंय
रहाटाच्या पुढयातील झाडांच्या सावलीत निसर्ग जेवण घ्यायचंय
टोपलीत ‘‘मावटी’’ बांधून आणलेल्या जेवणावर तुटून पडायचंय
केळीच्या ’’खोल्या’’वर भात-‘‘पानगा’’-सुक्या बोंबिलाचं आटवण फुरकायचंय
भल्या पहाटे उठून आईबरोबर ‘‘भाजी खुडायला’’ जायचंय
जुडया बांधायला येत नसल्या तरी दोनदोनच्या पटीत मोजायला शिकायचंय
जीवघेण्या थंडीत तळयातील पाण्यात गारठलेल्या हाताने त्यांना धुवायचंय
न लाजता डोक्यावर टोपली घेवून सोपारच्या बाजारात जायचंय
हक्काने आईकडून मोबदला म्हणून घेतलेल्या ‘‘गूळगुळया’’ला फस्त करायचंय
गोठयातील गायीला माळरानावर नेऊन हिरव्या गवतात चरवायचंय
तळयावर नेऊन स्वत: मनसोक्त डुंबत तिला गुंडीने स्वच्छ धुवायचंय
चिंचेच्या झाडावर बसून पुस्तकांचं पारायण करायचंय
दुसऱ्यांच्या शेतातून ढापलेल्या कैरी-टॉमेटो-कांदा चटणीला मस्त आस्वादायचंय
मला एक दिवस नक्कीच ‘‘भाटात’’ जायचंय...

## चारोळया

1) काठावर बसून पाण्याच्या खोलीचा अंदाज येत नाही,
त्यासाठी पाण्यात उडी घ्यावीच लागते.
कधी नाकातोंडात पाणी शिरते-, जीव गुदरमतो.
पण उद्दिष्ट साध्य केल्याचा आनंदही होतो

2) एक दिवस असा येतो
काळाकभिन्न अंधार डोळयासमोर पसरतो
नशीबही अश्यावेळी उलटतं
उदीग्न मन कोलमडून पडतं

3) गारवा धुंद होऊन आला
झुळूक लाजून त्यास सामोरी गेली
मुग्ध आलिंगनाचे गुंफण झाले
प्रितीचे वारे मनी बहरले

4) तळपावे सूर्यासारखे अखंड
स्वत:च्या जिवाचा दाह करून

डागाळला जरी देह चंद्राप्रमाणे आपला
शीतलता जगास देत राहावे.

5) शब्दांचा तूटवडा पडलाय दाद द्यायला
कदर करायची सोडून दिलीय
जीभ तोकडी पडलीय व्यक्त होण्यासाठी
अंतरीत भावनांचा दुष्काळ झालाय..

## --- सुनिल सोकाळकर